रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १७ ◆ अंक ४४

www.ramprahar.com

# राम प्रहर

शुक्रवार, ३० ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

अलिबागच्या दोन शाळांमध्ये विद्यार्थिनींचा विनयभंग/२

हिंगोली घटनेच्या निषेधार्थ तलाठ्यांचे आंदोलन/५

कर्जतमध्ये राष्ट्रीय खेळ दिवस उत्साहात साजरा/८

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते आज वाढवण प्रकल्पाचे भूमिपूजन



**पालघर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी (दि. ३०) महाराष्ट्राच्या दौर्‍यावर असून ७६ हजार कोटी रुपयांच्या वाढवण बंदर प्रकल्पाचे ते भूमिपूजन करणार आहेत. सकाळी सुमारे ११ वाजता पंतप्रधान मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२४ला संबोधित करतील. त्यानंतर दुपारी दीडच्या सुमारास पंतप्रधान पालघरमधील सिडको मैदानावर विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील. या वेळी त्यांच्या हस्ते वाढवण बंदराचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे ७६ हजार कोटी रुपये आहे. जागतिक दर्जाचे सागरी प्रवेशद्वार स्थापन करणे हे यामागचे उद्दिष्ट असून डीप ड्राफ्टमुळे मोठ्या कंटेनर जहाजांना तसेच अति-मोठ्या मालवाहू जहाजांना या बंदरांवर थांबा घेता येईल. त्यामुळे देशाच्या व्यापार व आर्थिक विकासाला चालना मिळेल.

# शिवरायांचा नवीन पुतळा उभारणार

## मुख्यमंत्र्यांचा निर्धार; विरोधकांना राजकारण न करण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

मालवणच्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्यानंतर विरोधक या मुद्द्यावर आंदोलन करीत आहेत. यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया देत झालेली घटना दुर्दैवी आहे, परंतु शिवराय ही आपली श्रद्धा, अस्मिता आहे. विरोधकांनी त्याचे राजकारण करू नये. तेथील वारे, वातावरण आणि एकूण परिस्थितीचा आढावा घेऊन महाराजांचा नवीन मजबूत पुतळा उभा करण्यात येणार आहे. सर्वांनी यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.



मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज सगळ्यांचे आराध्य दैवत आहे. त्यांच्या चरणावर मी एकदा नव्हे; तर १०० वेळा डोकं ठेवायला तयार आहे. शिवरायांचा आदर्श घेऊनच आम्ही राज्याचा कारभार करतोय. मी त्यांच्यासमोर नतमस्तक होतो. महाराजांनी विरोधकांनीही सद्बुद्धी द्यावी. महाराजांचा रूबाबदार पुतळा तिथे उभारण्यासाठी ज्या काही सूचना असतील त्या विरोधकांनी सांगितल्या पाहिजेत, सहकार्य केले पाहिजे.

नौदलाने चांगल्या भावनेने तो पुतळा उभारला, पण दुर्दैवाने ही घटना घडली. या घटनेचे राजकारण करणे त्यापेक्षा दुर्दैवी आहे. राजकारण करायला इतर मुद्दे आहेत, परंतु महाराज आपली श्रद्धा, दैवत आहे. यावर राजकारण करू नये, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### दोन समित्या स्थापन

मालवणची घटना मनाला वेदना देणारी आहे. नेव्हीने जो कार्यक्रम तिथे घेतला तो चांगल्या भावनेने घेतला होता. दुर्दैवाने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दुर्घटनाग्रस्त झाला. त्याबाबत काल महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नेव्हीचे अधिकारी, सरकारी अधिकारी होते. या वेळी दोन संयुक्त समित्या स्थापन केल्या. एक समिती दुर्घटना कशी झाली त्याची चौकशी व कारवाई करेल. दुसर्‍या समितीच्या माध्यमातून लवकरात लवकर शिवरायांचा पुतळा तिथे उभा राहिल ही जनसामान्यांची भावना आहे. त्यावर आम्ही लक्ष केंद्रित करतोय, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनजागृती करा -आमदार प्रशांत ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्र तसेच तालुक्यात सुरू असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत विधानसभा मतदारसंघ क्षेत्रनिहाय समितीची आढावा बैठक गुरुवारी (दि. २९) महापालिका मुख्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या योजनेबरोबरच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना व मुख्यमंत्री वयोश्री योजनेचाही आढावा घेण्यात आला. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी जनजागृती करा, असे अधिकारीवर्गाला सूचित केले.

या बैठकीस आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त संतोष वारूळे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सदस्य सचिव तहसीलदार विजय पाटील, नायब तहसीलदार राजश्री जोगी, सदस्य मेघा दमडे, प्रज्ञा चव्हाण, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, मंगेश अडसूळ, मनपा समाजविकास अधिकारी स्वप्नाली चौधरी, डेनयूलएम व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात, अभियंता गजानन देशमुख आदी अधिकारी उपस्थित होते. (पान २ वर..)

## मुंबई-गोवा महामार्गाचे निकृष्ट काम केल्याने ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

### प्रकल्प समन्वयक अभियंता सुजित कावळे यांना अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या इंदापूर ते वडपाले या २६.७ किमी अंतराचे चौपदीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे ठेकेदाराविरुद्ध माणगाव पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच प्रकल्प समन्वयक अभियंता सुजित सदानंद कावळे यांना अटक करण्यात आली आहे.

महामार्गाचे निकृष्ट काम केल्याप्रकरणी मे. चेतक एंटरप्रायझेस लि. (मे. चेतक अ‍ॅप्को, जेव्ही) कॉन्ट्रॅक्टर, ५०१, नमन सेंटर, सी ३१, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पश्चिम), मुंबई ५१ या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक हुकमीचंद जैन, जनरल मॅनेजर अवधेश कुमार सिंह, प्रकल्प समन्वयक अभियंता सुजित कावळे व कंपनीच्या इतर जबाबदार व्यक्तींविरुद्ध प्रकल्प अभियंता, राष्ट्रीय महामार्ग यांनी तक्रार केली होती. त्यानुसार माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (पान २ वर..)

## गुजरातमध्ये पुराने हाहाकार

### २६ जणांचा मृत्यू, अनेकांचे स्थलांतर



**गांधीनगर : वृत्तसंस्था**

गुजरातमध्ये काही दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत असून राज्याच्या अनेक भागात पूर आला आहे. बडोद्याला पुराचा सर्वाधिक फटका बसला आहे. दरम्यान, मागच्या तीन दिवसांत पाऊस आणि पुरामुळे २६ जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे, तर पूरग्रस्त भागातून १८ हजार लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याशी फोनवरून संवाद साधत या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी केंद्र सरकार पूर्ण ताकदीनिशी गुजरातच्या पाठीशी आहे, असे आश्वासन दिले आहे.

## पनवेलच्या पाणी प्रश्नासंदर्भातील योजनेचाही घेतला आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील पाणी प्रश्नावर गुरुवारी (दि. २९) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. महापालिका मुख्यालयात झालेल्या या बैठकीस आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, एमजीपीचे उपकार्यकारी अभियंता वेंगुर्लेकर, उपअभियंता वायदंडे, सिडकोचे कार्यकारी अभियंता गायकवाड आणि ठेकेदार उपस्थित होते. या वेळी न्हावाशेवा टप्पा ३ योजनेचा आढावा घेण्यात आला.

आमदार प्रशांत ठाकूर या वेळी म्हणाले की, सप्टेंबरअखेर न्हावाशेवा टप्पा ३ या योजनेचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे, पण कंत्राटदाराने यामध्ये प्रचंड दिरंगाई केलेली आहे. त्यामुळे या कामाला वेळ लागतोय. या संदर्भात आता फिजिकल रिपोर्ट सादर करण्याचे आदेश देण्यात आलेत. या कामांमध्ये असलेले पाईपलाईचे लेइंग, मूळ स्रोतापासून शुद्धीकरण केंद्राचे पाणी आणण्यापर्यंतचे काम असेल तिथे पंपिंग मशनरी बसवणे तसेच कळंबोली रोहिंजणपर्यंत पाईपलाईनचे लेइंग आहे. (पान २ वर..)

## निवडक

### अफगाणिस्तानमध्ये भूकंप; दिल्लीपर्यंत जाणवले धक्के

**नवी दिल्ली :** अफगाणिस्तानमध्ये गुरुवारी (दि. २९) सकाळी साडेअकराच्या सुमारास भूकंपाचा धक्का बसला आहे. याची तीव्रता ५.७ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. या भूकंपाचा प्रभाव राजधानी दिल्ली आणि आजूबाजूच्या परिसरातही जाणवला. सुदैवाने यात जीवित किंवा वित्तहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती आहे. दोन आठवड्यांपूर्वी अशाच प्रकारे भूकंप झाला होता.

### पासपोर्टची ऑनलाईन सेवा पाच दिवस राहणार बंद

**नवी दिल्ली :** पासपोर्ट (पारपत्र) ऑनलाईन पोर्टलची सेवा २९ ऑगस्ट ते २ सप्टेंबरपर्यंत बंद राहणार आहे. या काळात नव्या अपॉइमेंट्स दिल्या जाणार नाहीत तसेच आधी दिलेल्या अपाइमेंट्स रद्द करून त्यांना पुढच्या तारखा दिल्या जाणार आहेत. तांत्रिक कामांसाठी पासपोर्ट सेवा पोर्टल बंद राहणार आहे. ही नियमित चालणारी प्रक्रिया असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

## पश्चिम रेल्वेवरून पहिली मुंबई-गोवा ट्रेन धावली; गणेशोत्सवाआधी वचनपूर्ती



**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी गुरुवार (दि. २९)पासून सुरू झालेल्या वांद्रे टर्मिनस ते मडगावदरम्यान धावणार्‍या द्वि-साप्ताहिक ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. पश्चिम रेल्वेने या संदर्भातील व्हिडीओ आणि फोटो आपल्या एक्स अकाउंटवर पोस्ट करत माहिती दिली.

जून महिन्यात केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी कोकणासाठी पश्चिम रेल्वे मार्गावरून ट्रेन सोडण्याबाबतची मुंबईकरांची मागणी समजून घेतली होती. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी त्या वेळी रेल्वेमंत्र्यांशी चर्चा करून येत्या गणपतीत रेल्वेसेवा सुरू करण्याची घोषणा केली होती. गोयल यांनी दिलेला शब्द पाळत गणेशोत्सवाला आठवडाभराचा कालावधी शिल्लक असताना या रेल्वेसेवेचे उद्घाटन करत मुंबईतील कोकणवासीयांना दिलासा दिला.

पश्चिम रेल्वे मार्गावरून धावणारी ही पहिली मुंबई-गोवा ट्रेन आहे. मुंबईतील पश्चिम उपनगरे आणि गोव्यासह कोकण विभाग यांच्यातील संपर्क सुधारण्याच्या उद्देशाने ही नवी सेवा सुरू करण्यात आली आहे.

## विवेक पाटलांच्या जामिनावर आज पुन्हा सुनावणी

**पनवेल : प्रतिनिधी**

कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या ५१२.५० कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर गुरुवारी (दि. २९) पनवेल जिल्हा न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने पुढील सुनावणीसाठी ३० ऑगस्ट ही तारीख दिली आहे.

पनवेल जिल्हा न्यायालयात गुरुवारी दुपारी शेवटची ४० मिनिटे विवेक पाटील यांचे वकील राहुल ठाकूर यांनी युक्तिवाद केला. त्यांचा युक्तिवाद शुक्रवारी दुपारीही होणार आहे. त्यानंतर सरकारी वकील भोपी बाजू मांडतील. त्यानंतर पुन्हा अ‍ॅड. ठाकूर युक्तिवाद करतील. शेवटी न्यायालय जामिनावर निर्णय देईल. त्यामुळे या आठवड्यात विवेक पाटील यांचा जामीन होण्याची शक्यता कमी दिसते. परिणामी त्यांचा तळोजा जेलमधील मुक्काम वाढू शकतो.






# सर्वसामान्यांना हक्काचे घर देणार

## ◆ गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांचे प्रतिपादन




**मुंबई : प्रतिनिधी**

नागरिकांच्या हक्काच्या घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'सर्वांसाठी घरे' देण्याची संकल्पना मांडली आहे. त्यानुसार राज्य व केंद्र शासनाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना दर्जेदार आणि माफक दरात हक्कांची घरे मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले तसेच रियल इस्टेट क्षेत्रातील कंपन्यांनी सकारात्मक सहभाग नोंदवावा असे आवाहनही मंत्री सावे यांनी केले.

नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल यांच्या वतीने 'द रिअल इस्टेट फोरम २०२४' चे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते आज मुंबईतील ट्रायडंट हॉटेल येथे करण्यात आले. यावेळी नारडेकोचे अध्यक्ष प्रशांत शर्मा, चेअरमन किशोर भतिजा, संदिप रुणवाल, राजेश दोषी, गृहनिर्माण विभागाच्या सचिव वल्सा नायर, मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी आदी उपस्थित होते.

मंत्री सावे म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी घरकुल योजना, मोदी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना या योजनांची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिलच्या सदस्यांनी सहकार्य करावे.

राज्य शासनाने महिलांना गृहखरेदीमध्ये १ टक्के मुद्रांक शुल्क सवलत जाहीर केलेली आहे. याचा रिअल इस्टेट उद्योगाला अप्रत्यक्षपणे मोठा फायदा होणार आहे. मुद्रांक शुल्क अर्ज प्रक्रियेचे डिजिटायझेन करण्याचा शासनाचा मानस असल्याचे मंत्री सावे यांनी सांगितले.

राज्यात येत्या वर्षभरात एक लाख घरे देण्याचा आपला संकल्प आहे. प्रत्येकाला हक्काचे घर मिळावे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे. आगामी काळात राज्य शासनाच्या माध्यमातून गिरणी कामगारांसाठी सुमारे दीड लाख घरे बांधण्यात येणार आहेत. यासोबतच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी घरे बांधण्याचे लक्ष्य ठेवले आहे. राज्यात पुढील पाच वर्षांत ३५ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले असून त्यासाठी अर्थसंकल्पात ७४२५ कोटींची तरतूद केली आहे. यासाठी नरडेकोने पुढे यावे. आजच्या चर्चासत्राद्वारे केल्या जाणाऱ्या सूचनांचा नवीन गृहनिर्माण धोरणामध्ये समावेश करण्याबाबत शासन सकारात्मक विचार करेल, असे मंत्री सावे म्हणाले.

# 'गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यंत्रणांनी समन्वयाने काम करावे'

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकणातील गणेशोत्सव शांततेत, सुरळीत आणि विना अपघाती व्हावा, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील वाहनांची वर्दळ नियंत्रीत करण्यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार असून, नागरिकांनीदेखील प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन नवी मुंबईचे अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) डॉ. सुरेश कुमार मेकला यांनी केले आहे.

गणेशोत्सव काळात गणेश भक्तांना त्यांच्या गावी वेळेत पोहचता यावे व गणेशोत्सवादरम्यान वाहतुक कोंडी न होता हा सण निर्विघ्नपणे पार पाडावा यासाठी गुरुवारी (दि. २९) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस रायगड पोलीस अधिक्षक (महामार्ग) तानाजी चिखले, रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घारगे, पुणे विभाग महामार्ग पोलीस अधिक्षक विक्रांत देशमुख, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता सोनवणे, नवी मुंबई पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे तसेच विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



७ सप्टेंबरपासून सुरू होत असलेल्या गणेशोत्सव काळात राज्याच्या विविध ठिकाणांहून चाकरमाने कोकणात आपल्या गावी मोठया संख्येने जातात. शासकीय सुट्टीला जोडून दि. ७ व ८ शनिवार व रविवार आल्याने राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील वाहतुक कोंडी लक्षात घेता पोलीस प्रशासनामार्फत वाहतुकीचे विशेष नियोजन करण्यात आले असल्याची माहिती अपर पोलीस महासंचालक डॉ. मेकला यांनी दिली.

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ अंतर्गत मुंबई–पुणे दृतगती महामार्गावर गणेशोत्सव काळात वाहतुक कोंडी होऊ नये यासाठी डेल्टा फोर्स व पेट्रोलिंग वाहनांची गस्त वाढविण्यात आली आहे. महामार्ग क्र. ४८ वर किरकोळ दुरुस्ती अंतर्गत खड्डे बुजविणे, बाजूपट्ट्या दुरुस्त करणे, लेन मार्किंग करणे, माहिती फलक स्वच्छ करणे इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत. बोर घाटात अपघात कालीन परिस्थिती उद्भवल्यास एकूण चार ठिकाणी वाहतुक नियंत्रण व नियोजन करण्यासाठी घाट निरिक्षक प्रतिसाद पथक २४ तास तैनात करण्यात आले आहे.

गणेशोत्सव काळात कोकणात जाणाऱ्या जनतेची वाढती संख्या लक्षात घेता महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळामार्फत तीन हजार ते चार हजार बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. अपघात टाळण्याकरिता चालक आणि वाहक यांची अल्कोहोल चाचणी करण्यात येणार आहे. सहा अपघात प्रवण क्षेत्रात महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे पथक तैनात ठेवण्यात येणार आहेत.

बसस्टँडवरील चोरी सारखे अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व प्रकारची काळजी मंडळामार्फत घेण्यात येणार असल्याची माहिती या वेळी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या प्रतिनिधींनी दिली.

या वेळी मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील ब्लॅक स्पॉट, रस्ते दुरुस्ती तसेच इतर अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. गणेशोत्सवादरम्यान शासनाच्या विविध विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत चर्चा करण्यात आली.

## निवडक

### जंगलात आढळले मृत डुक्कर

**माथेरान :** येथील घनदाट जंगलात जंगली डुक्कर मृत अवस्थेत आढळले असून एका बंगल्याच्या कुंपणा शेजारी जंगली डुक्कर मृत अवस्थेत सापडल्याने जंगली प्राण्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. माथेरान पर्यटनस्थळाच्या डोंगरमाथ्यावर ३००हेक्टर टापुमध्ये घनदाट जंगल आहे. दुपारच्या सुमारास येथे एक जंगली डुक्कर मृत अवस्थेत आढळून आले.ही माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांना समजताच वनरक्षक, वनमजूर हे सर्व घटनास्थळी हजर झाले. त्यांनी पशुधन अधिकाऱ्यांना बोलावून त्याचे शवविच्छेदन करण्यात आले.

### नवी मुंबईत उद्या रोजगार मेळावा

**नवी मुंबई :** शिवसेना आणि विजय नाहटा फाउंडेशन आयोजित भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजता दरम्यान आगरी कोळी भवन पाम बीच रोड, सेक्टर २४, नेरूळ, नवी मुंबई या ठिकाणी होणार आहे. शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या पुढाकारणे आयोजित या मेळाव्यात देशभरातील नामांकित कंपन्या आणि बँकिंग रिटेल, एअरपोर्ट, मॅनेजमेंट, नर्सिंग, हॉस्पिटल, अकाउंट आदि विविध प्रकारचे शेकडो जॉब उपलब्ध करून असणार आहेत. गरजू बेरोजगार युवक आणि युवतीने या मेळाव्यात उपस्थित रहावे, असे आवाहन शिवसेना आणि विजय नाहटा फाउंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### गॅस्ट्रोच्या रुग्णांवर उपचार सुरूच

**कर्जत :** तालुक्यातील गौरकामत ग्रामपंचायतीमध्ये दोन दिवसांपासून सुरू झालेली गॅस्ट्रोची साथ आटोक्यात येण्याचे नाव घेत नाही. बुधवारी १९ रुग्णांना उपचारासाठी रुग्णलयात दाखल करावे लागले होते. त्यातील १२ रुग्ण बरे होऊन घरी गेले असले तरी आणखी नऊ दाखल झाले आहेत. असे एकूण १६ रुग्णांवर कर्जत उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गुरुवारी दिवसभरात रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घरे तसेच कर्जत पंचायत समितीचे माजी उपसभापती मनोहर थोरवे यांच्यासह अन्य राजकीय मंडळी यांनी भेट देऊन रुग्णानाची विचारपूस केली आहे. मनोहर थोरवे यांनी रुग्णाच्या औषधें आणि अन्य खर्चासाठी काही रोख रक्कमदेखील दिली आहे.



# पनवेल कोर्टात नवीन दोन मजल्यांच्या निर्मितीला मान्यता



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल येथील नवीन कोर्ट इमारतीतवर आणखी दोन मजल्यांच्या बांधकामाची प्रलंबीत मागणी महाराष्ट्र शासनाच्या हाय पॉवर कमिटी (एचपीसी)ने मान्य केली आहे. त्याबद्दल पनवेलच्या वकिलांनी समाधान व्यक्त केले.

पनवेलमध्ये जिल्हा न्यायालयाची इमारत अपुरी पडत असल्याने सध्याच्या तळमजला अधिक एकमजला इमारतीमध्ये अधिकचे दोन मजले बांधण्याची मागणी पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष मनोज भुजबळ व त्यांच्या सहकारी वकिलांनी केली होती. या मागणीचा पाठपुरावा आमदार प्रशांत ठाकूर, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवाचे माजी अध्यक्ष पारिजात पांडे यांच्यामार्फत करण्यात आला होता. त्याला यश येऊन महाराष्ट्र शासनाच्या हाय पॉवर कमिटीने त्याला मान्यता दिली.

यामुळे आता अनेक नवीन कोर्ट पनवेल येथे कार्यान्वित होऊन न्यायदान प्रक्रिया सुसह्य होऊन पक्षकार, वकील, संबंधीत यंत्रणा यांचा वेळ, श्रम, पैसे इत्यादी सर्व बाबींची बचत होणार आहे, अशी प्रतिक्रिया पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष मनोज भुजबळ यांनी दिली.

# मुलाने केली बापाला मारहाण

**मोहोपाडा, खालापूर :** रसायनीतील रिस येथील १९ वर्षीय मुलाला वडिलांनी रागावून हाताने थोडे मारले म्हणून रागावलेल्या मुलाने वडिलांना शिवीगाळ करीत लोखंडी रॉडने मारून जखमी केल्याची घटना रसायनी परिसरातील रिस गावात घडली आहे. या मुलाविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

रिस गावात राहणारे शिवदिपसिंग भजनसिंग (वय ४७, रा. रिस, खालापूर) वडिलांना घेऊन पनवेलला जाण्यास निघाले होते. त्यावेळी शिवदिपसिंग यांचा मुलगा मनज्योत याने घराची चावी मागितली. त्यावेळी झालेल्या बाचाबाचीत मनज्योत शिवदिपसिंग यांना मारहाण करून शिवीगाळ केली. त्यानुसार मनज्योतविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत अधिक तपास सुरू आहे.

# अलिबागमधील अनधिकृत कॉल सेंटरमधून अमेरिकन्सची फसवणूक

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रतिबंधीत गोळयांची मागणी केली असल्याने, झालेल्या फसवणूकीबाबत अमेरीकेत ग्राहक तक्रारी करून शकत नव्हते. प्रतिबंधीत गोळ्यांची मागणी केली म्हणून तेच कायदेशीर कारवाईत अडकण्याची शक्यता होती. त्याचा गैरफायदा अलिबाग तालुक्यातील पहरूर येथील अनधिकृत कॉल सेंटरमधून अमेरिकन लोकांची फसवणूक सुरू होती, अशी माहिती पोलीस तपासात समोर आली आहे.

अमेरिकेत व्हियाग्रा, सियालीस, लिवीट्रो या प्रतिबंधीत कामोत्तेजक गोळ्यांच्या वितरणासाठी यु एस फार्मा या अमेरीकन कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे भासवून तेथील नागरीकांना अलिबाग येथून संपर्क साधला जात होता. घरपोच गोळ्या वितरण करण्याचे अमिष या माध्यमातून दाखवले जात होते. जॉन या नावाचा वापर करून ग्राहकांशी संवाद साधला जात होता. यासाठी दोन विशिष्ट मोबाईल आणि इंटरनेट कॉलिंग अँपचा वापर केला जात होता. यात दोन विशिष्ट इंटरनेट कॉलिंग ॲप विकसित केली होती.

ज्या ॲपच्या माध्यमातून कुठल्याही देशातील नागरीकांशी त्यांच्याच देशातील नंबर मिळवून संवाद साधला जात होता. संभाषण कौशल्य आत्मसात करण्यासाठी फार्मा कंपन्यांच्या युट्यूब वरील चित्रफीतींची मदत घेतली जात होती. त्यामाध्यमातून कॉल सेंटर मध्ये कामाला असलेल्या मुलांना प्रशिक्षीत केले जात होते. ही मुले ग्राहकांशी अमेरिकन एसेंटमध्ये लिलया संवाद साधत होती. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास बसत असे, आणि त्यांची फसवणूक करणे सहज शक्य होत असे. गिफ्ट कार्डच्या माध्यमातून पैसे पाठविण्यास भाग पाडले जात असे.

**या गुन्ह्यात जप्त केलेल्या मोबाईल आणि संगणकांच्या तांत्रिक पृथकरणाचे काम सुरु आहे. त्यातून या गुन्ह्यातील अनेक पैलू आणि महत्वपूर्ण माहिती समोर येऊ शकेल.**

**–किशोर साळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अलिबाग**

# वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील चोळई येथील सुंदरराम मोरे महाविद्यालयासमोरील साईडपट्टीलगत बुधवारी सायंकाळी एका स्कूटरस्वाराला धडक देऊन अज्ञात वाहनाने पोबारा केला आहे. या अपघातात स्कूटर साईडपट्टीजवळ घसरल्यानंतर मागील बाजूने भरधाव वेगाने आलेल्या वाहनाखाली स्कूटरस्वाराचे डोके चिरडले गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून देण्यात आली.

पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटाच्या प्रारंभी चोळई येथील सुंदरराव मोरे महाविद्यालयासमोरील मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर बुधवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास एक नवीन




स्कूटर चालविणाऱ्या तरूणाचे वाहन महामार्गाच्या साईडपट्टीलगत घसरल्याने तो रस्त्यावर पडला आणि मागील बाजूने जाणाऱ्या भरधाव वाहनाखाली त्याचे डोके चिरडले. या वेळी पोलादपूर पोलीस आणि स्थानिकांनी मृतदेह पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये उत्तरीय तपासणीसाठी आणला. यानंतर त्याच्या पॅण्टच्या खिशातील पाकिटामध्ये आढळून आलेल्या व्होटरआयडी कार्डामुळे त्याची ओळख व पत्ता समजून आल्याचे पोलिसांनी सांगितले. सदर युवकाचे नाव सोहेल साळुंके (वय २६ वर्षे) आईचे नाव फरीदा साळुंके असून तो ठाणे शहरातील कळवा येथील जयदीप अपार्टमेंटच्या मागील ताकोली मोहल्ला येथील साळुंके निवासातील खोली क्रमांक ३ मधील रहिवासी असल्याची माहिती प्राप्त झाली.

या वेळी तो ठाणे महापालिका क्षेत्रातील कळवा–मुंब्रा येथून रत्नागिरी येथे स्कूटरवरून प्रवासाला निघाल्याची माहिती प्राप्त झाली. पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये युवकाचे पोस्टमॉर्टेम झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. याप्रकरणी अपघात रजिस्टर नंबरनुसार नोंद करण्यात आली असून पोलीस अज्ञात वाहनाचा तपास करीत आहेत.

# अलिबागच्या दोन शाळांमध्ये विद्यार्थिनींचा विनयभंग; गुन्हा दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चोंढी आणि अलिबाग येथील दोन नामांकित शाळांमधील विद्यार्थिनींच्या तक्रारीनंतर याप्रकरणी पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

चोंढी येथील शाळेत घडलेल्या घटनेत एका अल्पवयीन मुलाने पीडित मुलीचा पाठलाग करत, गाणी बोलत तिच्याशी बोलण्याचा, जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. तसेच पीडित मुलीने त्या मुलाकडे तिची शाळेत विसरलेली कंपास परत मागितली असता त्याने या मुलीला आणि तिच्या मैत्रिणीला अश्लिल शिवीगाळ केली. तसेच अपशब्द वापरुन हात लावत विनयभंगही केला.

ही घटना बुधवारी (दि. २८) सकाळी पावणेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. या मुलीच्या तक्रारीनंतर, मांडवा सागरी पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलाविरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक दीपक भोई करत आहेत.

तर दुसरी घटना २६ ऑगस्ट रोजी दुपारी अलिबाग शहराजवळील एका नामांकित शाळेत घडली आहे. दहावीत शिकणारी पीडित विद्यार्थिनी वर्गात नसताना, तिच्या दप्तरामध्ये कोणीतरी अश्लिल भाषेत चिठ्ठी लिहून ठेवली. त्या चिठ्ठीवर मुलाचे नावही लिहिण्यात आले होते. या विद्यार्थिनीच्या तक्रारीवरुन, अलिबाग पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक शरद शिंपने करीत आहेत.

पान १ वरुन

## योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनजागृती करा –आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी उपस्थितांकडून जाणून घेऊन त्यावर चर्चा केली. काही महिलांचे बँक खाते जास्त दिवसांपासून वापरात नसल्याने आधार कार्डशी लिंक नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या तक्रारींचे निवारण करण्यासाठी बँकांना मेलद्वारे सूचित करून लवकरात लवकर ही समस्या दूर करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थितांना सूचना दिल्या.

लाडकी बहीण योजनेंतर्गत महापालिका कार्यक्षेत्र व तालुक्यात आजपर्यंत एकूण एक लाख पाच हजार महिलांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. कागदपत्रांच्या अपूर्ततेमुळे ज्या महिलांचे अर्ज नामंजूर झाले होते त्यांच्याशी फोनच्या माध्यमातून संवाद साधून त्यांचे अर्ज मंजूर करण्यात आल्याची माहिती आयुक्त मंगेश चितळे यांनी दिली.

या वेळी आदिवासी पाड्यावरील महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ देताना येणाऱ्या अडचणी आमदारमहोदयांनी समजून घेत यावर उपस्थितांशी चर्चा करण्यात आली.

उपायुक्त वारूळे यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महापालिका कार्यक्षेत्रात प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याची माहिती दिली. या योजनेंतर्गत महापालिकेतील विविध विभागात ५२ युवकांना संधी दिल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे महापालिका कार्यक्षेत्रातील एमआयडीसी तसेच २०पेक्षा जास्त मनुष्यबळ असलेल्या व तीन वर्षापेक्षा जास्त वर्षापासून काम करत असलेल्या विविध कंपन्या, बँका, बांधकाम क्षेत्रांमध्ये प्रशिक्षणासाठी संधी उपलब्ध करून देण्याबाबत आस्थापनांशी संवाद सुरू असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा आढावा घेताना मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी आजपर्यंत आठ हजार ६५५ नागरिकांनी या योजनेंतर्गत अर्ज भरल्याची माहिती दिली. आशा सेविकांच्या मार्फत जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत ही योजना पोहचली जात असल्याचेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री वयोश्री योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी, अशीही सूचना या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली.

### पनवेलच्या पाणी प्रश्नासंदर्भातील योजनेचाही घेतला आढावा

या प्रत्येक कामाचे डिटेल, त्यांनी लागणारी मुदत याचा आढावा घ्यायला सांगितले. एक आठवड्यात त्याच्यासाठीची माहिती त्यांच्याकडून येणे अपेक्षित आहे. ते पूर्ण झाल्यावर पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर आणि पनवेल शहराचा महापालिकेचा भाग त्या सगळ्यामध्ये पाण्याचा तुटवडा दूर होईल.

आमदार प्रशांत ठाकूर आणि पालकमंत्री उदय सामंत यांची पनवेलच्या पाणी प्रश्नासंदर्भात गेल्या महिन्यात बैठक झाली होती. याच अनुषंगाने महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्यासोबत बैठक झाली. आता पुढच्या आठवड्यात सिडको परिसरातील सप्लायमधील पाण्याच्या तुटवड्यासंदर्भात सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांच्यासोबत बैठक होणार असल्याचे या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

पनवेल परिसरातली पाण्याची अडचण दूर होऊ शकते. त्यासाठी महापालिका, सिडको आणि एमजेपी या सगळ्यांनी एकत्र काम केले पाहिजे, असा आग्रह या बैठकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी धरला. या संदभात येणाऱ्या सात दिवसांमध्ये काय काम शक्य होणार आहे आणि काय केल्यामुळे महापालिकेला, सिडकोला पाच एमएलडी, दहा एमएलडी पाणी वाढीव मिळू शकते अशा ॲक्टिव्हिटी या पाण्यासाठी मॉनिटरिंग करण्याकरिता त्यांनी कामाला सुरुवात करावी, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सूचित केले.

### मुंबई–गोवा महामार्गाचे निकृष्ट काम केल्याने ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

कंपनीने महामार्गाच्या रूंदीकरण व आधुनिकीकरणाचे काम सुरू केले, पण त्यांनी हे काम मुदतीत पूर्ण न करता दर्जाहीन केले. दर्जाहीन कामामुळे व अपूर्ण असलेल्या कामाच्या ठिकाणी महामार्गास खड्डे पडले. काम पूर्ण झालेल्या ठिकाणी आवश्यक त्या सुरक्षा उपाययोजना यामध्ये थर्मोप्लास्टिक पेंट (पांढऱ्या पट्ट्या), कॅट आईज, डेलीनेटर, वाहनचालकांच्या माहितीसाठीचे माहिती, सूचना फलक लावणे, अनधिकृत रस्ते दुभाजक बंद करणे आवश्यक होते. हे कामही केले नाही. त्यामुळे या महामार्गावर अपघात होऊन होऊ लागले. २०२०पासून एकूण १७० मोटार अपघात झाले. त्यामध्ये एकूण ९७ प्रवाशांचा मृत्यू झाला. २०८ प्रवासी जखमी झाले. त्याचप्रमाणे वाहनांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे या ठेकदार कंपनीविरुद्ध मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक बेलदार करीत आहेत.

## निवडक

### तुराडे येथे शॉक लागून एकाचा मृत्यू

**मोहोपाडा :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत तुराडे एका व्यक्तीचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना घडली असून याबाबत पारसनाथ बनारसी मूळ गाव धतुओ-उत्तरप्रदेश सध्या राहणार मोहोपाडा याने रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली असून मयत राजकुमार शर्मा (वय ४५, रा. चांभार्ली) याला लाईटच्या बोर्डचा शॉक लागून मृत्यू झाल्याचे शवविच्छेदनात निष्पन्न झाले असून आकस्मात मृत्यू बी.एन.एस.एस. १९४ नुसार याबाबत रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई महेश धोंडे तसेच तपासिक अंमलदार सुवर्णा खाड्ये अधिक तपास करीत आहेत.

### गुटखा पॅकींग मशिनचा लिलाव

**पनवेल :** तालुका पोलीस ठाणे अंतर्गत गुन्ह्यात जप्त केलेल्या दोन गुटखा पॅकींग मशिनचा लिलाव करण्यात येणार आहे. ही मशिनची विल्हेवाट करण्याकरिता कारवाई करण्यात येत असून नमूद दोन गुटखा पॅकींगच्या लिलावात भाग घेण्यास इच्छुक व्यक्तींनी आपल्या कोटेशनसह पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे तीन दिवसांत संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस ठाण्याकडून करण्यात आले आहे.

# उरणमध्ये सीसीटीव्ही यंत्रणेची मागणी

## सुरक्षेसाठी प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

**उरण : प्रतिनिधी**

जुलै महिनाभरात उरण-पनवेल या रहदारीच्या मार्गावर झालेल्या हत्याकांडानंतर उरणकरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तर मागील अनेक महिन्यांपासून शहर आणि परिसरातील सीसीटीव्ही बंद असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे उरणमधील महिला आणि रहिवाशांची सुरक्षिततेच्या दृष्टीने उरण नगर परिषद व सुरक्षा यंत्रणांनी या समस्येकडे लवकरात लवकर लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

मुंबई आणि उरण तालुक्याला जोडणाऱ्या अटल सेतू आणि रेल्वे सेवेमुळे हे अंतर अवघ्या ३० ते ४० मिनिटांवर आले आहे. त्यातच, उरण तालुक्यातील वाढते व्यवसाय, कंटेनर यार्ड्स आणि बंदर यामुळे हजारो रहिवासी हे दररोज येजा करीत आहेत. यामुळे, उरण परिसरातील फ्लोटिंग पॉप्युलेशनची संख्या वाढली असून गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीमध्येदेखील वाढ झाली असून हत्या आणि चोरीच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे.



दरम्यान, उरण शहरातील बाजारपेठ ही तालुक्यातील व्यावसायिक आणि रहिवाशांसाठी मुख्य बाजारपेठ असल्याने दररोज हजारो रहिवासी हे बाजारहाटासाठी येत असतात. त्यातच, शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या रस्त्यांवरील सीसीटीव्ही हे गेल्या अनेक महिन्यांपासून नादुरुस्त असल्याने 'तिसरा डोळा' बंद झाला आहे. तसेच गेल्या वर्षभरापूर्वी उरण शहर आणि परिसरात सुमारे ८५ सीसीटीव्ही लावण्याचा प्रस्ताव पोलिसांकडून देण्यात आला होता. गेल्या महिनाभरापूर्वी उरण रेल्वे स्थानकानजीकच्या परिसरात एका तरुणीची निर्घृण हत्या करण्यात आल्याने संपूर्ण परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी बाजारपेठेतील गर्दीच्या ठिकाणी आणि शहराचे प्रवेशद्वार असलेल्या चारफाटा येथे तसेच, उरण शहरातील शाळांच्या बाहेर फिरणाऱ्या रोडरोमियोवर पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी पालकांकडून करण्यात येत आहे. यामुळे, उरण शहरातील बाजारपेठ, बाग आणि रेल्वे स्थानक परिसरातील सीसीटीव्ही तातडीने सुरू करण्याची मागणी रहिवाशांकडून करण्यात आली आहे.

> **उरण शहरातील बंद सीसीटीव्ही सुरू करून शहरातील हालचालीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कक्ष उभारण्यात येणार असून याची लवकरच अंमलबजावणी करण्यात येणार असून, त्याची कार्यवाही सुरू आहे.**
>
> **-जितेंद्र मिसाळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरण पोलिस ठाणे**

> **उरणच्या शहरातील मोक्याच्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून उरण नगर परिषदेच्या वतीने नव्याने सीसीटीव्ही बसविण्याचा आमचा उपक्रम आहे.**
>
> **-समीर जाधव, मुख्याधिकारी, उरण नगर परिषद**

# पनवेलमध्ये सव्वा लाख महिलांनी 'लाडकी बहीण'साठी केला अर्ज

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला पनवेलमध्ये जोरदार प्रतिसाद लाभत आहे. या योजनेसाठी पनवेलमधून तब्बल एक लाख पाच हजारपेक्षा अधिक महिलांनी अर्ज केले आहेत. यापैकी जवळपास एक लाख चार हजार पेक्षा अधिक अर्ज अप्रोव्हल करण्यात आले आहेत. राज्य सरकारने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ पनवेल मधील हजारो महिलांना मिळाला आहे. त्यांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा झाले आहेत.

महाराष्ट्र शासनाने गत महिन्यात महिलांसाठी माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. यात १८ ते ६५ वर्षांपर्यंतच्या महिलेला लाभ मिळणार आहे. या योजनेसाठी शासकीय स्तरावर मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. पनवेलमध्येदेखील या योजनेची चांगली अंमलबजावणी होताना दिसत आहे. पनवेल तालुका आणि पनवेल महापालिका हद्दीतील एकूण एक लाख पाच हजार ९११ महिलांनी या योजनेसाठी अर्ज केले. त्यापैकी एक लाख ४३६ अर्ज फेब्रुवारी करण्यात आले आहेत तर चार हजार २६८ अर्ज रिजेक्ट करण्यात आले. यात चुकीचे नाव, कागदपत्र कमी असणे किंवा बँक खाते व्यवस्थित न टाकल्यामुळे हे अर्ज तात्पुरत्या स्वरूपात रिजेक्ट करण्यात आले आहेत. ते पुन्हा नव्याने भरता येऊ शकतात.

या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पात्र नसलेल्या २०५ महिलांचे अर्ज कायमस्वरूपी बाद करण्यात आले आहेत. तर शासनाकडून आजपर्यंत ९६ हजार २५३ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. या योजनेसाठी पात्र असलेल्या महिलांनी तात्काळ अर्ज करावेत आणि या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

> **प्रक्रिया सोपी व सुटसुटीत**
>
> **सुरुवातीला या योजनेचे अर्ज भरताना महिलांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागला, मात्र त्यानंतर सरकारने यात अनेक बदल करत ही प्रक्रिया सोपी-सुटसुटीत बनवली. यानंतर असंख्य महिलांनी जुलै-ऑगस्ट महिन्यात हा अर्ज दाखल केला आणि त्यांच्या खात्यावर तीन हजार रुपये जमा झाले.**

## खारघरमध्ये आज बेवारस वाहनांचा लिलाव

**पनवेल : वार्ताहर**

खारघर पोलिस ठाण्यात वेगवेगळ्या गुन्ह्यात जप्त झालेली वाहने व बेवारस वाहनांचा शासकीय पद्धतीने शुक्रवारी (दि. ३०) सकाळी १०:३० वाजता लिलाव होणार आहे.

खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांनी सात दिवसांच्या आत ओळख पटवून वाहन घेऊन जाण्याचे आवाहन नागरिकांना केले होते. ८६ वाहनांतून ६७ वाहने शिल्लक आहेत. यातून काही गाड्या मूळ मालकास देण्यात आल्या आहेत. खारघर पोलीस ठाण्यात पडून असलेल्या ६७ वाहनांची उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून पडताळणी व मूल्यांकन करण्यात आले आहे.

ज्यांना लिलावामध्ये भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी खारघर पोलीस ठाणे येथे लेखी आवेदन देण्यात यावे. तसेच लिलावात सहभाग घेणाऱ्यांनी अनामत रक्कम ७५ हजार रुपये पोलीस ठाण्यात जमा केल्यावर लिलावात सहभाग होता येईल. त्याचबरोबर लिलाव वाहनांमध्ये ज्यांची वाहने चोरी झाली असतील किंवा मिळून येत नाहीत त्यांनी येऊन वाहनांची खात्री करावी, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांनी केले आहे.

# कुष्ठपीडितांच्या मी नेहमी पाठीशी!

- *आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन*
- *पनवेलमध्ये संघटनेचे अधिवेशन*



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या समाजाला पद्मश्री राम नाईक यांच्यासारखे एक खंबीर नेतृत्व मिळाले आहे. त्यांच्या रूपाने आपल्या संघटनेच्या आणि समाजाच्या मागण्यांची पूर्तता नक्कीच होत असते, परंतु ज्या ज्या वेळेस तुम्हाला माझी गरज भासेल त्या त्या वेळेस मी आपल्या पाठीशी उभा राहीन, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि. २९) अधिवेशनात दिली.

महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेच्या वतीने पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात कुष्ठपीडित व्यक्तींचे एक दिवसीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. त्या अधिवेशनाला माजी राज्यपाल पद्मश्री राम नाईक आणि पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्या वेळी ते बोलत होते. या अधिवेशनात कुष्ठ वसाहतीतील प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेच्या माजी अध्यक्ष यांचा सत्कार करण्यात आला.

या अधिवेशनास माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, अपाल अर्थात कुष्ठरुग्ण प्रभावित व्यक्तीच्या संघटनेच्या अध्यक्ष मायाताई रनवरे, शांतिवनचे उदय ठकार, महाराष्ट्र व मध्य प्रदेश प्रोग्राम ऑफिसर सचिन पाटीदार, महापालिकेचे उपायुक्त संतोष वारूळे, महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटना अध्यक्ष जितेंद्र चव्हाण, सचिव अशोक अंबेकर, उपाध्यक्ष संतोष गाडेकर, खजिनदार शफी शेख आदी उपस्थित होते.

## सेलोटेप मशिनप्रकरणी सव्वा लाखाची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

सेलोटेप मशिन न देता एका महिलेची सव्वा लाखाची फसवणूक केल्या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवीन पनवेल येथे राहणाऱ्या कोमल क्षिरसागर या ऑनलाईन इंडिया मार्ट वेबसाईटवर सेलोटेप बनविण्याची मशिन सर्च करीत होत्या. या वेळी त्यांना सचिन गांजेकर यांचा फोन आला व ही कंपनी पुणे येथे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानुसार त्या आपले पती व सासरे यांच्यासह पुणे येथे कंपनीत गेले व तेथे दिलीप चेदे व सचिन गांजेकर यांना भेटून मशिन पसंद केली. तसेच एक लाख ३५ हजार रुपये टप्प्याटप्प्याने देणार असल्याचे सांगितले. त्यानुसार त्यांच्याकडे पैसे जमा केले. मशिनची पूर्ण रक्कमदेवून सुद्धा मशिन देण्यास ते टाळाटाळ करीत होते. पैसे परत मागितले असता त्यांनी धनादेश दिला तो सुद्धा बाऊन्स झाल्याने अखेरीस त्यांनी या दोघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## भानूदास माने यांची बदली

**पनवेल :** एक ते दीड महिन्यांपूर्वी ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, पनवेल येथील उपअभियंता भानूदास माने यांची नियुक्ती झाली होती. त्यांची उपअभियंता यांत्रिकी विभागात बदली करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी तसे आदेश दिले आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा उपअभियंता या पदी तात्पुरत्या स्वरूपात स्नेहल धुपकर यांची नियुक्ती केली आहे.







**पनवेल : वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे यांच्या वतीने जिल्हा परिषदेच्या बामणडोंगरी येथील शाळेत विद्यार्थी व शिक्षकवृंदासाठी स्नेहभोजन आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाबद्दल शाळेने अमर म्हात्रे व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले.**

## खारघरमध्ये माकडांच्या टोळ्यांचा उच्छाद

**खारघर : प्रतिनिधी**

खारघर सेक्टर ३४,३५ परिसरातील गृह निर्माण सोसायटीत गेल्या काही दिवसांपासून माकडांचा उपद्रव वाढला आहे. अन्नाच्या शोधात माकडांच्या टोळ्या वसाहतीत शिरत असल्याचे दिसून येत आहे. वन विभागाने माकडांचा उपद्रव थांबवण्यासाठी उपाय योजना करावी, अशी मागणी रहिवाशीयाकडून केली जात आहे.

खारघर सेक्टर ३० ते ३६ हा परिसर डोंगराला लागून आहे. त्यामुळे या सेक्टर मधील सोसायटीच्या आवारात अनेक साप निदर्शनास येते. मागील महिन्यात सेक्टर ३५मध्ये रस्त्याच्या कडेला असलेल्या गटारात घोरपड निदर्शनास आली होती. दरम्यान गेल्या पंधरा दिवसांपासून सेक्टर ३४,३५ परिसरातील सोसायटीच्या स्विमिंग पूल आणि आवारात माकडांच्या टोळ्याचा उपद्रव वाढला आहे. याच सेक्टर मध्ये रेझां ग्रांऊण्डर या सोसायटीत देखील हि माकडे घरात शिरून रहिवाशांवर हल्ला करीत असल्याचे येथील रहिवाशांनी सांगितले. वनविभागाने या माकडांचा बंदोबस्त करण्याची मागणी मोडक यांनी या वेळी केली.



माकडांच्या टोळ्याकडून लहान मुले तसेच महिलांवर माकडानी हल्ला केल्यास त्यास कोण जबाबदार, असा प्रश्न रहिवाशीयांकडून विचारला जात आहे. सोसायटीच्या सदस्यांकडे विचारणा केली असता, शेजारी असलेल्या जंगलात फळे तसेच माकडांना लागणारे खाद्य प्राप्त होत नसेल त्यामुळे अन्नाच्या शोधात माकड वसाहतीत शिरत असावे, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात पालकांसाठी सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी व निकोप वातावरण निर्मितीसाठी शाळेत सखी सावित्री समिती तयार करण्यात आली आहे. या समितीची सहविचार सभा तसेच गुरुकुल शिक्षक पालक संघ माता पालक संघ यांची सहविचार सभा आज आयोजित करण्यात आली होती.



विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेसाठी पालकांना जागरूक राहता यावे त्यांचं उद्बोधन व्हावे यासाठी एन. आर. आय. पोलीस स्टेशन बेलापूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर खडके साहेब व पोलीस हवालदार हेमंत लेंडघर यांना बोलविण्यात आले होते. पोलीस निरीक्षक किशोर खडके यांनी विद्यालयातील सीसीटीव्ही याची पाहणी करून स्वच्छतागृह, विद्यालयाचा परिसर याची देखील पाहणी केली.

यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर खडके यांनी पालकांना विद्यार्थी सुरक्षिततेसाठीचे नियम, त्याचबरोबर सायबर सुरक्षिततेसाठीचे नियम, मोबाईलचा वापर करताना घ्यावयाची काळजी, एखादा अ‍ॅप इन्स्टॉल करताना घ्यावयाची काळजी, लिंक भरताना कोणती खबरदारी घ्यावी याबाबतीत बहुमोल असे मार्गदर्शन केले.

विद्यालयाच्या उपशिक्षिका पल्लवी पवार यांनी सहविचार सभेचे प्रास्ताविक केले. उपशिक्षिका वेदांगी म्हात्रे यांनी शाळा आणि पालक यांच्यावर आलेली जबाबदारी विविध उदाहरणांच्या सहाय्याने पालकांसमोर मांडली. मुख्याध्यापिका तसेच गुरुकुल विभागाच्या प्रमुख रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी पालकांना गुरुकुल प्रकल्पाबद्दल माहिती देऊन त्या प्रकल्पाचे वेळापत्रक, त्यामध्ये घेण्यात येणारे विविध उपक्रम यांची माहिती दिली. एन.आर.आय.पोलीस स्टेशन बेलापूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर खडके यांनी मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे ज्योत्स्ना ठाकूर यांनी आभार मानले.

# रोडपाली येथे दहीहंडी उत्सव





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माउली फाउंडेशन व स्वर्गीय त्रिंबक जोमा ठाकूर सामाजिक संस्थेच्या वतीने दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाचे आयोजन रोडपाली येथील स्व. दि.बा. पाटील मैदानात करण्यात आले होते. ही हंडी फोडण्याचा मान कळंबोली दहीहंडी या पथकाला मिळाला.

या दहीहंडी उत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. या उत्सवाचे प्रमुख आकर्षण सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. तब्बल लाख हजार रुपयांची ही हंडी गोविंदा पथकांसाठी आयोजित करण्यात आली होती. कळंबोली रोडपाली येथील स्वर्गीय दि.बा. पाटील मैदानात हा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा झाला. या ठिकाणी अनेक पथकांनी मानवी मनोरे रचून सलामी दिली.

या वेळी उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, जेष्ठ नेते बाळासाहेब पाटील, उपाध्यक्ष जयंत पगडे, शिवसेनेचे पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे, बबन पाटील, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, अशोक मोटे, माजी नगरसेविका मोनिका महानवर, प्रमिला पाटील यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## लहान भावाचा मोठ्या भावावर हल्ला; गुन्हा दाखल

**पनवेल :** भांडणाचा राग मनात धरून लहान भावाने मोठ्या भावाला लोखंडी रॉडने ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी कृष्ण भगवान साळवी (वय ३६, राहणार आझाद नगर झोपडपट्टी, पनवेल, रेल्वे रोड) याच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रदीप भगवान साळवी यांचा भाऊ कृष्ण भगवान साळवी यांनी प्रदीपसोबत यापूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून त्यांना ठार मारण्याच्या उद्देशाने २७ ऑगस्ट रोजी घराचा दरवाजा आतमधन लावून घेतला आणि घरामध्ये असलेल्या लोखंडी रॉडने प्रदीप यांच्या डोक्यात आणि दोन्ही हातावर मारहाण केली. यात त्यांच्या डोक्याचे हाड आणि डाव्या हाताचे बोट फ्रॅक्चर झाले. त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी कृष्ण साळवी यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला.

## संपादकीय

# वाढते वणवे : धोक्याची घंटा

जगभरातील वणव्यांचे प्रमाण आणखी वाढण्याचा इशारा एका ताज्या अहवालात देण्यात आला आहे. जागतिक तापमानवाढ वणव्यांच्या या वाढत्या प्रमाणास, तीव्रतेस आणि व्याप्तीस कारणीभूत असली तरी आपल्याकडे वनसंपदेची लूट करण्यासाठी जंगलांना जाणीवपूर्वक आग लावली जाते हेही सर्वज्ञात आहे. वणव्यांमुळे होणारी हानी भरून काढणे मानवी आवाक्याच्या पलीकडचे असल्यामुळे ते रोखण्यासाठीच प्रभावी प्रयत्न व्हायला हवेत.

**या वर्षी मे महिन्यात आपल्याकडे आसाम आणि उत्तराखंडमध्ये वणव्यांनी जंगलाला वेढले होते. परिस्थिती इतकी गंभीर होती की हवाई दल आणि भारतीय लष्कराची मदत घ्यावी लागली. सध्या दक्षिण अमेरिका खंडातील ब्राझिलमधील ॲमेझॉनच्या पर्जन्यवनांमध्ये लागलेल्या वणव्यांमुळे या प्रदेशातील नागरिकांना कफ, घशात जळजळ आणि डोळे लाल होणे अशा त्रासाला मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागते आहे. हवामानबदलामुळे या पर्जन्यवनांमधील वणव्यांचे प्रमाण २० पटींनी वाढण्याचा इशारा एका ताज्या अहवालात अलिकडेच देण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'अर्थ सिस्टिम सायन्स डेटा' या विज्ञानपत्रिकेत 'वणव्यांची सद्यस्थिती अहवाल' प्रकाशित झाला असून यात मार्च २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीतील जगभरातील वणव्यांचा अभ्यास करून काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत. यात गंभीर स्वरूपाचे वणवे म्हणून कॅनडा, ग्रीस तसेच ॲमेझॉनमधील वणव्यांचा समावेश करण्यात आला आहे. जागतिक हवामानबदलामुळे कॅनडामधील वणव्यांची शक्यता तिप्पटीने तर ग्रीसमध्ये ती दुप्पटीने वाढल्याचे अहवालात म्हटले आहे. गेल्या काही दशकांमध्ये जगभरातील वणव्यांची तीव्रता आणि व्याप्ती वाढली आहे. कॅनडातील वने आणि ॲमेझॉन खोऱ्यातील पर्जन्यवनांसारख्या कार्बन धरून ठेवणाऱ्या महत्त्वपूर्ण जंगलांची वणव्यांमुळे प्रचंड हानी होते आहे. वणव्यांचे वाढलेले प्रमाण, तीव्रता आणि भौगोलिक व्याप्ती ही मानवीजीवनासाठी धोक्याची घंटा असल्यामुळेच या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. अहवालानुसार, जगभरात वर्षभराच्या कालावधीत वणव्यांमुळे ८.६ अब्ज टन कार्बन उत्सर्जन होते. सगळ्यात गंभीर बाब म्हणजे, जगभरातील कार्बन उत्सर्जनाच्या सुमारे २५ टक्के उत्सर्जन हे निव्वळ कॅनडातील विक्रमी वणव्यांमुळे घडले. वणव्यांची शक्यता आणि तीव्रता का वाढते आहे असा प्रश्न कुणाला पडला असल्यास, वाढलेले तापमान, आर्द्रतेतील घट, वेगवान वारे आणि घटलेला पाऊस यामुळे वणव्यांच्या संख्येत वाढ होते आहे. आपल्याकडे तर वनसंपदेची लूट करण्यासाठी जंगलांना जाणीवपूर्वक आग लावली जाते हेही सर्वज्ञात आहे. वनसंपदा आणि वन्यजीव यांच्या संरक्षणासाठी वनविभागाला हे प्रकार रोखण्यासाठी चक्क बक्षीसयोजना जाहीर करावी लागते. आपल्याकडचे ९९ टक्के वणवे हे मानवनिर्मित असतात असे आपल्या वनविभागाकडून सांगितले जाते. जंगलात आग लावणे हा दंडनीय अपराध असून त्यासाठी तीन वर्षांपर्यंत कैद आणि २५ हजार रूपये दंड होऊ शकतो, परंतु कागदावरील हे कायदे समाजकंटकांच्या विनाशकारी कारवाया रोखण्यास अपुरे पडतात असेच म्हणावे लागेल. ॲमेझॉनच्या खोऱ्यातही शेतीच्या कामामुळे वणव्यांचे प्रमाण वाढल्याची नोंद होते आहे. कॅनडा आणि विशेषत: ॲमेझॉनच्या खोऱ्यातील वने हा जागतिक नैसर्गिक वारसा आहे. त्यांची वणव्यांमुळे होणारी हानी आपण भरून काढायची ठरवली तरी त्यास काही दशके वा शतके लागू शकतील. त्यामुळेच मानवी हस्तक्षेपामुळे लागणारे वणवे रोखण्यासाठी जगभरातच प्रभावी उपाय योजले जाण्याची गरज असून यासंदर्भात जागरूकता निर्माण व्हायला हवी आहे.**

# अलिबागला अनैतिक व्यवसायांचा विळखा





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग हे एक पर्यटन केंद्र आहे. येथील निसर्गसौंदर्याची भूरळ सर्वांनाच पडते. मिनी गोवा म्हणून अलिबागची ओळख आहे, पण अलिकडच्या काही वर्षांतील घडामोडींचा विचार केल्यास मुंबईचे उपनगर होण्याच्या मार्गावर असलेले अलिबाग भविष्यात अनैतिक उद्योगधंद्यांचे केंद्र बनण्याची शक्यता आहे. यामुळे अलिबाग बदनाम होतेय. हा धोका ओळखून पोलिसांनी व अलिबगकरांनी सावध राहिले पाहिजे. सामाजिक जबाबदारी म्हणून याकडे पाहणे आवश्यक आहे.

यापूर्वी अलिबाग तालुक्यातील काही भागांमध्ये धाडी टाकून पोलिसांनी अमली पदार्थ जप्त केले होते. त्यानंर काही हॉटेलांमध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश केला. पेझारीजवळ अमली पदार्थ बनविणारा कारखाना पोलिसांनी उद्ध्वस्त केला होता. आता बोगस कॉल सेंटरवरही धाडी टाकल्या. या कॉल सेंटरमधूनदेखील परदेशी नागरिकांना कामोत्येजक गोळ्या मिळवून देण्याचे आमिष दाखवून फसवले जात होते. या सर्व प्रकरणांमुळे अलिबागची बदनामी होत आहे. तालुक्यातील परहूर येथे एका हॉटेलमध्ये अनधिकृत कॉल सेंटर चालवले जात होते. तेथे पोलिसांनी छापा टाकला. ३२ जणांना अटक केली. असेच कॉल सेंटर आवास येथे सुरू होते. तेथे छापा टाकून दोघांना अटक करण्यात आली.

रेवदंडा येथेही एका रिसॉर्टवर बोगस कॉल सेंटर सुरू करण्याचा मानस आरोपींचा होता. तशी बोलणीही जागा मालकांशी झाली होती, मात्र परहूर येथील बोगस कॉल सेंटरचा पोलिसांनी पर्दाफाश केल्याने, रेवदंडा येथील कॉल सेंटर सुरूच होऊ शकलेले नाही. यावरून हे प्रकरण किती गंभीर आहे, याची कल्पना करता येते. अशी कॉल सेंटर अलिबाग तालुक्यात सुरू नसतीलच, असे म्हणता येणार नाही.

कॉल सेंटरच्या माध्यमातून रात्रीच्या वेळीच काम सुरू असायचे. काम करणारे कॉल सेंटरमध्ये सर्वजण मुंबईतून गाड्या घेऊन येत असत आणि मोबाईल आणि संगणकावरील ॲपच्या माध्यमातून परदेशातील नागरिकांशी संपर्क साधून त्यांना प्रतिबंधित कामोत्येजक गोळ्या घरपोच देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केली जात होती. फसवणुकीची रक्कम गिफ्ट कार्डच्या माध्यमातून हवालामार्गे नंतर भारतात आणले जात होते.

वसई-विरार परिसरातही राजोडी समद्रकिनाऱ्यालगत असलेल्या रिसॉर्टमध्ये यापूर्वी बोगस कॉल सेंटर सुरू होते. या कॉल सेंटरच्या माध्यमातून ऑस्ट्रेलियन बँकेची कोट्यवधींची फसवणूक झाल्याची बाब समोर आली होती. अर्नाळा सागरी पोलिसांनी या कॉल सेंटरवर धाड टाकून ४९ जणांना अटक केली होती. या टोळीचा म्होरक्या नवीन भूतानी होता. त्याला पोलिसांनी अटकही केली होती. आता अलिबाग तालुक्यातील परहूर परिसरातील निर्जन ठिकाणी असलेल्या रिसोर्टमध्ये बोगस कॉल सेंटर प्रकरणाचा मूळ सुत्रधार रोहित बुटानी असल्याचे सांगितले जात आहे. त्याचा शोध घेऊन त्याला अटक केली पाहिजे कारण या कॉल सेंटरमुळे अलिबागबरोबरच आपल्या देशाचे नावही बदनाम होत आहे.

काही महिन्यांपूर्वी एका पंचतारांकीत हॉटेलसह इतर नामांकीत हॉटेल्समध्ये चालवल्या जाणाऱ्या सेक्स रॅकेटचा पोलिसांनी बुरखा फाडला होता. मुंबई, पुण्यासारख्या महानगरांमधून देशी विदेशी मुलींच्या मदतीने हॉटेलचालकांनी अनैतिक धंदा उघडला होता. इंटरनेटच्या माध्यमातून परदेशी मुलींच्या साह्याने चालवल्या जाणाऱ्या सेक्स रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला होता. यात पाच विदेशी मुलींची सुटका करण्यात आली होती. अलिबागमध्ये पर्यटनाच्या उद्योगाबरोबरच अनैतिक उद्योगांनी हातपाय पसरण्यास काही वर्षांपासून सुरुवात झाली आहे. शहरातील तीन नामांकीत हॉटेल्सवर धाडी टाकून पुण्याहून आणण्यात आलेल्या १८ मुलींची सुटका केली. या प्रकरणी सात आरोपींना अटक करण्यात आली. या दोन घटनांमुळे शहरात वाढत्या पर्यटनाबरोबर फोफावत असेलेल्या अनैतिक धंद्यांचा खरा चेहरा समोर आला आहे. एकाद्या ठिकाणी धाड टाकली की, तेथील व्यवासाय बंद होतो, परंतु इतर ठिकाणी ते सुरूच असतात.

अलिबामध्ये महाविद्यालयीन तरुणांना गांजा विकणाऱ्या एका टोळीचे नेटवर्क काही दिवसांपूर्वी पोलिसांनी उद्ध्वस्त केले होते. शहरातील विविध भागात छापे टाकून पोलिसांनी मोठ्या प्रमाणात गांजा हस्तगत केला होता. पेझारीजळ एका घरात सुरू असलेला आरएमडी अमली पदार्थ तयार करण्याचा करखाना नवी मुंबई पोलिसांनी उद्ध्वस्त केला होता.

या सर्व घटनांकडे पाहता असे दिसते की, अलिबागवर चंगळवादी संस्कृतीचे आक्रमण होत आहे. अमली पदार्थ, सेक्स रॅकेट आता बेकायदा कॉल सेंटर यामुळे अलिबागची बदनामी होत आहे. भविष्यात असे प्रकार वाढणार आहेत. अलिबाग व आसपासची हॉटेल या अशा धंद्यांचह केंद्र होतायेत. त्यांना पैसा मिळतोय, पण अलिबागची बदनामी होतेय. त्याला वेळीच रोखल पाहिजे. अन्यथा हे प्रकार वाढत जातील. त्यामुळे अलिबागकरांनी सावध राहिले पाहिजे. भविष्यात अलिबाग अनैतिक धंद्यांचे केंद्र बनू नये यासाठी काळजी घ्यायला हवी. पोलीस करवाई करतीलच, परंतु आपल्या आसपास असे काही धंदे सुरू असतील तर तेथील ग्रामस्थांनी त्याबाबत पोलिसांना महिती दिली पाहिजे. पोलिसांना कारवाई करण्यास भाग पाडले पाहिजे. पोलिसांच्या कारवाईमुळे काही ठिकाणचे धंदे काही दिवस थांबतील. ते पुन्हा सुरू होणार नाहीत याची खबरदारीदेखील घ्यायला हवी. अलिबाग तालुक्यात पसरणारा अनैतिक धंद्यांचा विस्तार रोखायचा असेल, अलिबागची बदनामी थांबवायची असेल तर सामुदायिक प्रयत्न होणे गरजेचे आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# रेल्वे प्रवाशांना दिलासा! दोन तासांत रिफंड मिळणार

रेल्वेचे तिकीट काढायचे म्हटले अनेक दिव्यांतून पार जावे लागते. तिकीट अव्हेलेबल दिसते पण पैसेच कापले जातात, पैसे कापताना जे गोल गोल चक्र फिरू लागते की तिकीटच मिळत नाही. वेटिंग, तत्काळची तर बातच न्यारी. अशा या समस्यांपासून रेल्वेने प्रवाशांची सोडवणूक करण्याचा विडा उचलला आहे. तुमचा रिफंड दोन तासांत तुमच्या खात्यात मिळणार आहे.





पुढील वर्षी मार्चपर्यंत नेक्स्ट जेनरेशन ई-टिकिंग प्लेटफार्म विकसित केला जाणार आहे. यामुळे तिकीट काढण्याचा वेग कित्येक पटींनी वाढणार आहे. आयआरसीटीसीच्या दाव्यानुसार ९२ टक्के लोकांना दोन तासांत रिफंड दिला जात आहे. आता ज्या लोकांना रिफंड येत नाहीये ते त्या ८ टक्क्यांत आहेत, असे समजावे.

आयआरसीटीसी आणि क्रिस तिकीट प्लॅटफॉर्म अपडेट करत आहे. तत्काळ तिकीटे काढण्यास जी समस्या येते ती दूर करण्याचा प्रयत्न गेली अनेक वर्षे रेल्वे करीत आहे. नवीन व्हर्जन पुढील वर्षी मार्चमध्ये लागू केले जाणार आहे, असे आयआरसीटीसीचे सीएमडी संजय कुमार जैन यांनी म्हटले आहे.

आयआरसीटीसीने आपल्या वेबसाइटवर ऑटो पे नावाची सेवा सुरू केली आहे. तिकीट बुक केल्याशिवाय बँक खात्यातून पैसे कापले जात नाहीत. ज्यांची तिकिटे रद्द झाली आहेत किंवा तिकीट बुक झालेले नाही त्यांचे पैसे परत केले जात आहेत. लवकरच १०० टक्के टार्गेट पूर्ण केले जाणार असल्याचे रेल्वेचे अधिकारी म्हणाले. ऑटो पे सिस्टम दर तासाला याचा आढावा घेते आणि पैसे परत करते, असे ते म्हणाले. बँक खात्यातून पैसे कापले गेले असले तरी ते वळते केले जात नाहीत, ते दोन तास ब्लॉक केले जातात आणि नंतर पुन्हा प्रवाशाच्या खात्यात टाकले जातात, असे ते म्हणाले.

ज्यांचे तिकीट वेटिंगवर असेल आणि त्यांना पैसे कापले जावेत असे वाटत नसेल तर तसेही केले जाणार आहे. ज्यांना वेटिंग तिकीट नकोय त्यांचे पैसे कापले जाणार नाही. ट्रांजेक्शन फेल झाले तरीही बँकेतून पैसे कापले जाणरा नाहीत. ते पैसे दोन तासांसाठी ब्लॉक केले जातील आणि पुन्हा टाकले जातील.

# आंतरराष्ट्रीय व्हेल शार्क दिवस



**निमित्त**

३० ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय व्हेल शार्क दिन म्हणून घोषित करण्यात आला आहे. व्हेल शार्क आणि त्याच्या संवर्धनासाठी समर्पित एक दिवस भारतात आधीपासूनच अस्तित्वात आहे. वाईल्डलाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया (डब्ल्यूटीआय), इंटरनॅशनल फंड फॉर निमल वेल्फेअर, गुजरात फॉरेस्ट डिपार्टमेंट आणि टाटा केमिकल्स लिमिटेड यांचा संयुक्त उपक्रम, गुजरातमधील बहुप्रशंसित व्हेल शार्क मोहिमेचा हा एक भाग होता.

भारतासह ४०हून अधिक देशांचे प्रतिनिधित्व करणारी CONANPची घोषणा, ज्यांच्या व्यापक वर्तनासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची आवश्यकता आहे- अशा प्रजातींच्या संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. डब्ल्यूटीआयचे कार्यकारी संचालक विवेक मेनन यांनी या घोषणेवर समाधान व्यक्त केले. व्हेल शार्कच्या संवर्धनासाठी त्याच्या समविचारी संघटनांना एकत्र करून त्याचे निश्चितच सकारात्मक परिणाम होतील. जागरूकता वाढवण्याबरोबरच, या भव्य प्रजातींच्या आंतरराष्ट्रीय संरक्षणासाठी मजबूत लॉबिंग सुलभ करेल, असे ते म्हणाले. टाटा केमिकल्स लिमिटेडच्या कम्युनिटी डेव्हलपमेंटच्या प्रमुख अलका तलवार म्हणाल्या, व्हेल शार्क आता जगभरात चिंतेचा विषय बनला आहे. या घोषणेमुळे आमची मोहीम मोठी होण्यास मदत होईल आणि अधिकाधिक लोक त्याकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहतील. आम्हाला आशा आहे की यामुळे या अद्भूत प्रजातींचे संरक्षण करण्यासाठी एकाग्रतेने प्रयत्न केले जातील.

२००१पर्यंत भारतीय किनारपट्टीच्या राज्यांमध्ये, विशेषत: गुजरातमध्ये शेकडोच्या संख्येने व्हेल शार्कची शिकार करण्यात आली होती. त्याच वर्षी मे महिन्यात, वन्यजीव (संरक्षण) कायद्याच्या अनुसूची I मध्ये सूचीबद्ध केल्यानंतर, भारत सरकारने व्हेल शार्कच्या शिकारीवर बंदी घातली होती. १९७२, २००२मध्ये CITESच्या परिशिष्ट II मध्ये व्हेल शार्कची यादी करण्यात भारताचीही मोठी भूमिका होती, तथापि जागरूकतेच्या अभावामुळे आणि व्हेल शार्कच्या शिकारीतून उच्च आर्थिक नफा यांमुळे व्हेल शार्कची शिकार चालूच राहिली. या समस्येचा सामना करण्यासाठी जानेवारी २००४मध्ये व्हेल शार्क मोहीम सुरू करण्यात आली.

हितधारकांच्या विविध स्तरांना लक्ष्य करण्याच्या बहु-आयामी दृष्टिकोनासह, मोहिमेने गुजरातला व्हेल शार्क संवर्धनासाठी रोल-मॉडेल राज्यात यशस्वीरित्या रूपांतरित केले. एका अध्यात्मिक नेत्यासोबत राजदूत म्हणून, मोहिमेने गुजरातमधील मासेमारी समुदायाला शिकारीपासून व्हेल शार्कच्या संरक्षणवादीमध्ये बदलले. गुजरात राज्याने अखेरीस व्हेल शार्क दिवस प्रत्येक वर्षी कार्तक अमास सणाच्या अनुषंगाने साजरा केला जातो.

CONANPने अलीकडील घोषणेमुळे या प्रजातीबद्दल आंतरराष्ट्रीय स्तरावर जनजागृती करून व्हेल शार्क संवर्धनास मदत होईल. इको-टुरिझम क्षेत्राला होणाऱ्या फायद्यांद्वारे व्हेल शार्कच्या संवर्धनालाही यामुळे मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय व्हेल शार्क दिवस भारतातील इतर राज्यांमध्ये जेथे व्हेल शार्क आढळतात तेथे त्याचे संरक्षण लोकप्रिय करण्याच्या आमच्या प्रयत्नांना बळ देईल असे, व्हेल शार्क मोहिमेचे व्यवस्थापक आणि डब्ल्यूटीआयचे समन्वयक धीरेश जोशी म्हणाले.

**(साभार : वाईल्डलाईफ ट्रस्ट ऑफ इंडिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**श्रीवर्धन : बोर्ली पंचतन येथे गोपाळकाल्यावेळी गोविंदा पथकांनी जल्लोष करत हा सण साजरा केला.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

# 'या' पानांच्या सेवनाने वजन कमी होण्यास मदत

देशभरात सणांचे दिवस सुरू आहे. अवघ्या काही दिवसांमध्ये गणरायचे आगमन होणार आहे. त्यानंतर नवरात्र, दसरा आणि मग दिवाळीचा सण...अशात तुमचे वाढलेले वजन आणि पोटाची चरबी कमी करण्यासाठी आयुर्वेदात एक जबरदस्त फॉर्म्युला सांगण्यात आलाय. घरात शुभ कार्य असेल तर आपण आर्वजुन आंब्याची पाने आणतो. या आंब्यांच्या पानांचे आरोग्यासाठीही खूप फायदे आहेत. वजन कमी करण्यासाठी ही पाने खूप गुणकारी आहेत.



जर तुम्ही लठ्ठपणाचे शिकार असाल तर तुम्ही आंब्याच्या पानांचा चहाचे सेवन करू शकता. या पानांचा अर्क मधुमेह आणि लठ्ठपणावर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. त्यात अनेक प्रकारचे संयुगे असतात, जे चयापचय क्रिया सुधारतात. फ्लेव्होनॉइड्स चयापचय सुधारण्यासाठी ओळखले जातात. यामुळे शरीरातील अतिरिक्त कॅलरीज बर्न होण्यास मदत मिळते. तुमची रुंद कंबर पातळ होऊन तुमचे पोट आतमध्ये जाते.

आंब्याची पाने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासदेखील मदत करतात. वजन नियंत्रित ठेवण्यासाठी साखरेची पातळी स्थिर राहणे अतिशय महत्त्वाचे आहे. आंब्याच्या पानांमध्ये असलेली संयुगे इंसुलिन संवेदनशीलता सुधारून रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करतात. आपल्या आहारात आंब्याच्या पानांचा समावेश केल्यास भूक कमी लागते. वजन कमी करण्यासाठी पचनशक्ती चांगली असणे गरजेचे असते. यामध्ये आंब्याची पाने महत्त्वाची भूमिका निभावतात. आंब्याच्या पानांमध्ये असलेले फायबर विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करते आणि निरोगी पचनास प्रोत्साहन देते. आंब्याच्या पानांमध्ये असे काही गुणधर्म असतात जे शरीरातील चरबीचे प्रमाण कमी करतात. हे महत्वाच्या अवयवांभोवती जमा झालेली चरबी आणि व्हिसेरल फॅट कमी करण्यास मदत करते. यामुळे अनेक प्रकारच्या समस्यांचा धोका वाढतो. तुम्ही चहामध्ये आंब्याची पाने टाकू त्याचे सेवन करु शकता. त्याची ताजी पाने सूप आणि भाज्यांच्या ग्रेव्हीमध्ये तुम्ही टाकू शकता. २-३ आंब्याची पाने दोन कप पाण्यात टाकून उकळा. ते निम्मे झाल्यावर गाळून घ्या. चव आणण्यासाठी आपण थोडे मध आणि लिंबाचा रस घालू शकता. ही पानं उन्हात वाळवून पावडर बनवा. तुम्ही ते सूप आणि पेयांमध्ये मिसळूनही पिऊ शकता.

# खालापुरातील स्वच्छतागृहाची दयनीय अवस्था

## महिलावर्गाची प्रचंड गैरसोय



**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील एकमेव सार्वजनिक स्वच्छतागृहाची दयनीय अवस्था झाली असून महिला वर्गाला प्रचंड अवहेलना सहन करावी लागत आहे.

तालुक्याच्या ठिकाणी अनेक वर्षे सार्वजनिक स्वच्छतागृह नसल्याने विविध कामासाठी येणाऱ्या नागरिकांना विशेषतः महिलांची कुचंबना व्हायची. पाच वर्षांपूर्वी नगरपंचायतीने पुढाकार घेत तहसील कार्यालय, बसस्थानक, पोलीस ठाणे अशा मध्यवर्ती ठिकाणी स्वच्छतागृह बांधले. त्यामुळे खालापूर शहरात बाहेरून येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला होता. सध्या या स्वच्छतागृहाची व्यवस्थित देखभाल होत नसल्याने स्वच्छतागृह म्हणजे जणू काय नरक बनला आहे.

स्वच्छतागृहात भोवती पावसाने जमा झालेली शेवाळ, स्वच्छतागृहाच्या आतील भागातील उखडलेल्या फरशा, तुंबलेले शौचालय आणि प्रचंड अशी दुर्गंधी यामुळे आतमध्ये पाऊल ठेवण्याचीदेखील कोणाची हिंमत होत नाही. याबाबत महिलांमधून नाराजी व्यक्त होती आहे.

मुख्य रहदारीच्या ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृह असल्याने परिसरातदेखील मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत आहे.

शहरात मोठ्या प्रमाणात विकास काम सुरू असून थोडा निधी सार्वजनिक स्वच्छतागृहाच्या डागडुजीकडे वळवावा जेणेकरून स्वच्छ खालापूर सुंदर खालापूर प्रतिमेला तडा जाणार नाही, अशी चर्चा नागरिकांमधून करण्यात येत आहे.

### समाजकंटकांकडून जाणीवपूर्वक तोडफोड

***स्वच्छतागृहाची नियमित सफाई होत असून काही समाजकंटक जाणीवपूर्वक पाईप तसेच बेसिन, फरशीची तोडफोड करतात. यापूर्वीदेखील अनेकदा असे प्रकार घडले असल्याची माहिती सफाई कामगारांचे मुकादम यांनी दिली.***

**अनेक खासगी कार्यालय मध्यवर्ती ठिकाणी असून या ठिकाणी काम करणाऱ्या महिला तसेच शासकीय कार्यालयात विविध कामासाठी येणारे नागरिकांना आवश्यक स्वच्छतागृहांची सोय नसल्याने मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.**


**-संतोष मुंडे,**
**सामाजिक कार्यकर्ता**

# द.ग.तटकरे महाविद्यालय इमारतीचे भूमिपूजन आणि पदवी प्रदान सोहळा



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाने शिक्षण संस्था अधिक सक्षम करण्याच्या घेतलेल्या भूमिकेला महायुतीचे बळ मिळेल, असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.



मंडळाच्या द.ग.तटकरे महाविद्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचा भूमिपूजन सोहळा तसेच द.ग.तटकरे महाविद्यालय व अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयाचा पदवी प्रदान सोहळा गुरुवारी (दि.२९) झाला. या वेळी मंत्री तटकरे बोलत होत्या.

कार्यक्रमास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अॅड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा गांधी, अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयाचे चेअरमन अॅड. विनोद घायाळ, तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष सुभाष केकाणे, शिवसेना तालुका प्रमुख अॅड. महेंद्र मानकर, सामाजिक कार्यकर्ते संजय साबळे, संस्था पदाधिकारी नितीन बामगुडे, विरेश येरुणकर, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली बुरटे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, योगिता चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, संदीप खरंगटे, दिलीप जाधव, सभापती शर्मिला सुर्वे, नगरसेवक दिनेश रातवडकर, सुनील पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष नितीन वाढवळ, माजी पं. स. सदस्य शैलेश भोनकर, राष्ट्रवादी अध्यक्ष शादाब गैबी, सुमित काळे, सौरभ खैरे, सचिन देसाई, सिद्धांत देसाई, सुधाकर शिपूरकर व गणेश वाघरे, प्राचार्या मनीषा मोरे, प्राचार्या निशिगंधा मयेकर पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

मंडळाचे अध्यक्ष अॅड. राजीव साबळे यांनी, येथील द.ग.तटकरे महाविद्यालयाचा भूमिपूजन त्या काळात माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्या हस्ते व तटकरे साहेबांच्या माध्यमातून केले. तटकरे महाविद्यालयात आज २००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या महाविद्यालयात विविध कोर्सेस शिकविले जातात. अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयातून अनेक विध्यार्थी वकील होऊन बाहेर पडले आहेत. आमच्या संस्थेला नर्सिंग कॉलेजची मान्यता मिळाली असून येथे मेडिकल कॉलेज सुरू करण्याचाही संस्थेचा मानस असून या साठी मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे पाहत तुमच्या सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता असल्याचे म्हणाले. सोहळ्याचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या प्रा. आमरीन नाडकर, प्रा. महेरीन डावरे यांनी केले.

# आयुष्यमान भारत ओळखपत्र नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष तथा केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत योजना प्रदेश सेलचे राज्य सहसंयोजक दिलीप भोईर यांच्या नियोजने तालुक्यातील नांदगाव आणि काशीद येथे आयुष्यमान भारत ओळखपत्र नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

उपाध्यक्ष दिलीप ठाकूर यांनी स्वखर्चाने शिबिराचे आयोजन करण्यात आल्याबद्दल येथील नागरिकांनी त्यांचे आभार मानले. या वेळी काशिद ग्रामपंचातीच्या सदस्य दिया कासार, भाजप दक्षिण रायगड युवा मोर्चा चिटणीस रोहन खोपकर, अलिबाग मंडल सरचिटणीस दिनेश राऊत, अलिबाग-मुरूड-रोहा विधानसभा आयटी सहसंयोजक सुरेंद्र गिरणेकर, दक्षिण रायगड जिल्हा चिटणीस महेंद्र चौलकर, मुरूड तालुका उपाध्यक्ष स्वप्निल चव्हाण, कार्यकर्ते दिनेश कासार, आदिनाथ सानेकर, पंकज घरत, शिवदास भागांना, अनिल नांदगावकर, भूषण साळवी, शुभम देसाई आदी उपस्थित होते.




# रोह्यात ८० गोविंदांना मोफत उपचार सेवा

**धाटाव : प्रतिनिधी**

गोविंदा दहीहंडीचे थरावर थर रचताना छोट्या मोठ्या दुखापती व जखमा होतात. त्यासाठी आवश्यकता असते तत्काळ उपचाराची सेवा मिळण्याची. त्याचे काम रोह्यातील डॉ. भट नर्सिंग होम व रोटरी क्लब रोहा सेंट्रल यांनी संयुक्त विद्यमाने चोख केली. गोविंदाचा सरावात आणि गोकुळाष्टमीपर्यंत ८० गोविंदा जखमी तरुण हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. त्यांच्यावर मोफत उपचार करण्यात आले.

भट नर्सिंग होमचे डॉ. अपूर्व भट, डॉ. पूजा भट, डॉ. तुषार, डॉ. अभिषेक राप्ते, डॉ. अभिजीत जोशी व हॉस्पिटल स्टाफने सर्व जखमी रुग्णांवर उपचार केले, तसेच रोटरी क्लब रोहा सेंट्रलचे अध्यक्ष राम नाकती, सचिव राकेश कागडा व सर्व सदस्य, सामाजिक कार्यकर्ते जयवंत मुंढे यांनी जखमी रुग्णांची इतर सोय बघण्यात मोठी मदत केली.



# हिंगोलीतील घटनेच्या निषेधार्थ तलाठ्यांचे काम बंद आंदोलन



**अलिबाग : प्रतिनिधी**

हिंगोलीच्या वसमत तालुक्यातील आडगाव रंजे येथील तलाठी संतोष पवार यांची कार्यालयात हत्या करण्यात आली. त्याचा रायगड जिल्हा तलाठी संघातर्फे निषेध करण्यात आला. सर्व तालाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी गुरुवारी (दि.२९) एक दिवस काम बंद आंदोलन केले. आपल्या मागणीचे निवेदन अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांना सादर केले.

या वेळी जिल्हा तलाठी संघ अध्यक्ष वल्लभ म्हस्के, राज्य तलाठी पटवारी मंडळ अधिकारी संजय शिंगे, अलिबाग तालुका तलाठी अध्यक्ष संतराम हंगे, मंगेश ईगरुळकर, श्रीनिवास मेतरी, मंदार गायकवाड, शिल्पा कवठे, प्रदीप थोरात, सत्यावान पाटील, तेजस्विनी काळे, मंडळ अधिकारी नलिनी पाटील, रिना म्हात्रे आदी उपस्थित होते.

हे प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून तज्ज्ञ ज्येष्ठ सरकारी विधिज्ञांमार्फत कायद्यानुसार शिक्षा देण्यात यावी, यासाठी शासनाकडून प्रयत्न व्हावेत, मयत तलाठी यांच्या कुटुंबियास किमान ५० लाख रुपयांची विशेष तत्काळ मदत शासनाने त्वरीत जाहीर करावी, भविष्यात त्यांच्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहासाठी त्यांच्या वारसांना अनुकंपाद्वारे तत्काळ शासकीय सेवेत समाविष्ट करुन घ्यावे, अशा मुख्य मागण्यांचे निवेदन जिल्हा तलाठी संघाने अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांना दिले आहे.



**माणगाव : राज्यसभेचे खासदार म्हणून बिनविरोध निवडून आलेले भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांची नगरसेविका ममता थोरे यांनी भेट घेऊन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सोबत पदाधिकारी व कार्यकर्ते.**


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-शिवकर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| २४५/२ ब | ०-२८-६०<br>पो. ख. ०-०१-५०<br>**एकूण ०-३०-१०** | ५.७५ | **श्री. दिपक श्रीपत खानविलकर<br>सौ. रसिका संजय आंब्रे** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. २९/०८/२०२४**

**सही/-**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१


# जय भवानी पथक रोह्यातील मुख्य दहीहंडीचे मानकरी

**रोहे : प्रतिनिधी**

सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित भव्य दहीहंडी स्पर्धेत आठ थर लावून जय भवानी रोठखुर्द पथकाने २,२२,२२२ रु. ची मुख्य हंडी फोडून पारितोषिक पटकावले.

खासदार सुनील तटकरे महिला, बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या दहीहंडीचा थरार हजारो नागरिकांनी अनुभला. त्याचबरोबर कलाविष्काराने साकारलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा आस्वाद नागरिकांनी लुटला.

पुरूष व महिला अशा एकूण ५६ गोविंदा पथकांनी दहीहंडीसाठी थर लावले. यशस्वी झालेल्या गोविंदा पथकामध्ये तालुक्यातील १९ पुरूष गोविंदा पथक सात थर लावण्यात यशस्वी झाले आहेत. चार गोविंदा पथक सहा थर लावण्यात यशस्वी झाले आहेत. जिल्ह्यातील अन्य तालुक्यातील सात पुरुष गोविंदा पथक सात थर लावण्यात यशस्वी झाले आहेत. १० गोविंद पथक सहा थर लावण्यात यशस्वी झाले आहेत.

तालुक्यातील चार महिला गोविंदा पथक पाच थर लावण्यात यशस्वी झाले आहेत. सहा महिला पथक चार थर लावण्यात यशस्वी झाले आहेत. अन्य तालुक्यातील चार महिला गोविंदा पथक पाच थर लावण्यात यशस्वी झाले आहेत. दोन गोविंदा पथक चार थर लावण्यात यशस्वी झाले आहेत.



# भजनभूषण गजाननबुवा पाटील यांची गुरूपौर्णिमा उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

भजनभूषण म्हणून लौकिक असलेले गजाननबुवा पाटील यांची ५३वी गुरुपौर्णिमा कर्जत येथे झाली. तीन जिल्ह्यांतून त्यांचे शिष्य गुरुपौर्णिमा उत्सवासाठी हजर होते.

येथील श्री कपालेश्वर मंदिर येथे भजनभूषण स्व. गजाननबुवा पाटील स्मारक समितीचे वतीने गुरुपौर्णिमा सोहळ्याचे आयोजन केले होते. अध्यक्ष दीपक करोडे यांच्या हस्ते गजाननबुवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सोहळ्याला सुरुवात झाली. या वेळी बुवांचे बंधू वसंतबुवा पाटील, जोमा वाणी, रणजित पाटील, मधुकर धोंगडे, सूर्याजी ठाणगे, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, माजी नगरसेवक संतोष पाटील, संकेत भासे, महेंद्र चंदन, दिलीप आंबवणे, प्रकाश पालकर, महेंद्र भोईर, विकास चित्ते, आत्माराम निघोजकर, नंदू कदम आदी उपस्थित होते.

सोहळ्याची सुरुवात गजाननबुवा यांचे सुपुत्र प्रसादबुवा पाटील यांनी पंचपदीने झाली. त्यांना मृदुंगवर रणजित बुवा पाटील, तबलावर आकाश काटे यांनी साथ दिली. त्यानंतर शिष्यांनी अभंगवाणीमधून आदरांजली वाहिली. अलिबाग येथील यशवांत कोळसे, जयवंत पाटील, संतोष देशमुख, सुनील देशमुख, रामचंद्र फुलावरे, रंभाजी थोरवे, किशोर बोराडे, विष्णू घरत, विलास बोराडे, काळू बुवा, सोपान थोरवे, थोरवे बुवा, रवींद्र लाड आदी शिष्यांनी भजनातून आदरांजली वाहिली.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | *Esti. Cost* |
|---|---|---|
| Tend-47/ 24-25 RFX 7000032415 | Work of construction 1 No. of 22kV feeder for M/s Bharat Petroleum Ltd. plant at 220kV Uran substation under EHV (O&M) Division Panvel. | Rs. 88.95 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 29.08.2024 to 05.09.2024 up to 11:00 hrs**, **Opening date:-05.09.2024 @ 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/-+ GST** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ३१/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | नवीन पाताळगंगा पाणीपुरवठा योजना.... अशुद्ध जलउदंचन केंद्र व शुद्ध जलउदंचन केंद्रातील विद्यमान प्रणालीचे नुतनीकरण व सुधारणा करणे. | ₹ ३०,२९,३८,५०४.०० |
| २ | महाड औद्योगिक क्षेत्र..... महाड औद्योगिक क्षेत्रातील विविध ठिकाणच्या विद्यमान आरसीसी संरचनांचे (स्ट्रक्चर्सचे) थक्सोट्रॉपिक प्रक्रिया करून दुरुस्ती व मजबुतीकरण करणे, खराब झालेल्या कंपाऊंड भिंतीची पुनर्बांधणी करणे, आरसीसी टॉयलेट ब्लॉक व सुरक्षा केबिन बांधणे तसेच प्रक्रियीत सांडपाणी संकलन टाकी व सीवेज ट्रीटमेंट प्लांट (एसटीपी) टाकीकरीता सुगंधी पॉलिमेरिक नेटवर्क सिस्टम (एपीएनएस) प्रक्रिया लागू करणे. | ₹ ६,७६,५५,९९४.०० |
| ३ | नवीन पाताळगंगा पाणीपुरवठा योजना..... पाताळगंगा येथील नवीन जलशुद्धीकरण केंद्रातील सांडपाणी पुनर्वापर प्रणालीचे आयडीईएएल डीएएफ व एसीपीआरसी द्वारे अपग्रेडेशन करणे. | ₹ ५,५५,८८,०७७.०० |

उपरोक्त अ.क्र. १ वरील कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक ३०/०८/२०२४ ते दिनांक १३/०९/२०२४ पर्यंत व अ.क्र. २ व ३ वरील कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ३०/०८/२०२४ ते दिनांक ०९/०९/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील अ.क्र. १ वरील कामाबाबत दिनांक ०४/०९/२०२४ पूर्वी व अ.क्र. २ व ३ वरील कामांबाबत दिनांक ०२/०९/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र. १ वरील कामाबाबत दिनांक ०६/०९/२०२४ पासून व अ.क्र. २ व ३ वरील कामांबाबत दिनांक ०३/०९/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक



### अहिराणी कवितासंग्रहाला पुरस्कार

**नवी मुंबई :** महापालिकेच्या सचिव तथा साहित्यिक व कवयित्री चित्रा बाविस्कर यांच्यामाय मन्ही अहिराणी या कवितासंग्रह ला महाराष्ट्र अहिराणी परिषद याच्या वतीने साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राध्यापक डॉ. एन.के. ठाकरे यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. माय मन्ही अहिराणी या काव्यसंग्रहाला प्रस्तावना आकाशवाणी जळगाव केंद्राचे माजी केंद्र प्रमुख, ख्यातनाम साहित्यिक, कवी श्री. उत्तम कोळगांवकर यांनी लिहिली आहे.

### अधिकारी, कर्मचारी यांना पदोन्नती

**नवी मुंबई :** मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले नमुंमपा अधिकारी आणि कर्मचारी यांची पदोन्नती तसेच त्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करणे हे विषय महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार प्रशासन विभागामार्फत विशेष लक्ष देत मार्गी लावण्यात येत आहेत. या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली, प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार व पदोन्नती निवड समितीने १२ संवर्गातील ८५ अधिकारी, कर्मचारी यांना पदोन्नती व १९ संवर्गातील २१२ अधिकारी, कर्मचारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार लवकरच या अधिकारी, कर्मचारी यांना तशा प्रकारचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. विशेषत्वाने यामध्ये तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार करण्यात आलेला आहे.

### ‘लायन्स’तर्फे अपंग महिलेला घरघंटी

**पनवेल :** लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे दहिवली, सोमाटणे येथील ज्योती पांडुरंग पाटील या गरजु अपंग महिलेला तिच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून घरघंटी देण्यात आली. ज्योती पाटील यांनी घरघंटी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि लायन्स सरगम क्लबचे आभार मानून यामुळे खूप मदत होईल असे सांगितले. या वेळी पनवेल सरगम क्लबच्या अध्यक्षा मानदा पंडित, सचिव प्रेमेंद्र बहिरा, संजय गोडसे, स्वाती गोडसे, संध्या महानुभाव तसेच ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील उपस्थित होते.



# २० लाखांचे हेरॉईन जप्त

## नवी मुंबईत तिघांना अटक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलिसांनी हेरॉईन हा अंमलीपदार्थ विक्री प्रकरणी दोन पुरुष आणि एका महिलेस अटक केले आहे. त्यांच्याकडे १०० ग्रॅम वजनाचे हेरॉईन आढळून आले असून त्याचे मूल्य वीस लाख आहे. ही कारवाई अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली आहे. तुर्भे एमआयडीसीतील प्रेमनगर येथील नवजीवन शाळेनजीक असणाऱ्या एका घरातून अंमली पदार्थ पुरवले जात आहेत, अशी माहिती पोलीस हवालदार गणेश पवार यांना मिळाली.



या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस आयुक्त, भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत नायडु, पोलीस हवालदार रमेश तायडे, उत्तम लोंखडे, गणेश पवार, पोलीस शिपाई योगिता शेळके, अर्चना पाटील, अंनत सोनकुळ, या पथकाने या ठिकाणी छापा घातला. पथकाच्या हाती तीन आरोपी लागले असून त्यात एका महिलेचा समावेश आहे.

आरोपींकडे २० लाख रुपये किमतीचा १०० ग्रॅम वजनाचा हेरॉईन हा अंमली पदार्थ आढळून आला. त्यांच्याविरुध्द तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाणे येथे गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक वसीम शेख करीत आहेत. या आरोपींची अंमली पदार्थ पुरवणारी साखळी असून अन्य आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत, अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांनी दिली.

दरम्यान, दिवसेंदिवस अमली पदार्थांची तक्सरी होणारी अनेक प्रकरणे समोर येत असल्याने या प्रकाराला आळा घालण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

## अटकेतील नायजेरियन महिलेचा पळून जाण्याचा प्रयत्न फसला

**पनवेल : वार्ताहर**

अमली पदार्थ तस्करीप्रकरणी अटक करण्यात आलेल्या अलिशा केम (वय २५) या नायजेरीयन महिलेने तिच्या घराचा पंचनामा करताना पोलिसांच्या ताब्यातून तिसऱ्या मजल्यावरून खिडकी द्वारे पाईपने खाली उतरून पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी वेळीच या महिलेला पुन्हा जेरबंद केले. त्यानंतर पोलिसांनी या महिलेविरोधात आणखी एक गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेली अलिशा केम ही महिला मुळची नायजेरीयन देशातील असून सध्या ती उलवे एका इमारतीत राहण्यास आहे. आलीशा केम हिच्याजवळ सापडलेले अमली पदार्थ जप्त करुन तिला एनडीपीएस कलमाखाली अटक केली होती.

पोलीस तपासासाठी तिला तिच्या उलवे सेक्टर–१७ मधील सीवूड्स हार्मनी या इमारतीतील घरी घेऊन गेले होते. या वेळी केम हिने महिला पोलिसांच्या हाताला हिसका देऊन घरातील किचनमध्ये पळ काढत खिडकीवाटे बाहेर पडून गॅलरीच्या पाईपच्या मदतीने पहिला मजल्यावरुन खाली उडी मारून पळुन जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी प्रसंगावधान दाखवत तिला तत्काळ जेरबंद केले.

## जसखारच्या सरपंचपदी प्रणाली म्हात्रे यांची निवड

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील जसखार ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी प्रणाली किशोर म्हात्रे यांची निवड झाली आहे.

जसखार ग्रामपंचायत शिवसेना ठाकरे गटाकडे होती, परंतु ठाकरे गटाच्या सरपंच काशिबाई ठाकूर यांचे पद हे शासकीय जागेत केलेल्या अतिक्रमणामुळे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी १९ जुलै २०२४ अपात्र केले होते, परंतु काशीबाई ठाकूर यांनी मा. कोकण आयुक्त यांच्या कडे आफिल अर्ज केला होता. त्या अर्जाच्या पहिल्या सुनावणीच्या वेळी मा.अतिरिक्त विभागीय आयुक्त विकास पानसरे यांनी २ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांच्या आदेशावर स्थगिती देण्यात आली होती, परंतु पुढील सुनावणीस दरम्यान सामनेवाला यांचे वकील ॲड. परेश देशमुख यांनी आपली बाजू मांडल्यानंतर अतिरिक्त विभागीय आयुक्त विकास पानसरे यांनी २३ ऑगस्ट २०२४ रोजी काशीबाई ठाकूर यांचे आफिल अर्ज फेटाळले आहे.

जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र ग्रामपंचायत विवाद अर्ज क्र. ०१/२०२३ मध्ये १७ जुलै २०२४ रोजी दिलेले आदेश कायम केला आहे. आता पुन्हा एकदा सरपंच म्हणून प्रणाली किशोर म्हात्रे (शिवसेना शिंदे गट) ह्यांनी पदभार स्वीकारला आहे. त्यांचे सर्व गटातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




## मोहोपाडा आदिवासीवाडीत दाखले वाटप शिबिराला प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील आदिवासी जमातीच्या व्यक्तींना प्रत्येक गावांमध्ये व इतर वाडयांमध्ये जावून जातीचे दाखले, आयुष्यमान भारत कार्ड, रेशनकार्ड, आधारकार्ड, जनधन खाते, इतर आवश्यक प्रमाणपत्रे व पीएम किसानचा लाभ देण्याकरिता वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीतील मोहोपाडा वाडीत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

आदिम जमातीच्या (कातकरी) विकासाकरिता प्रधानमंत्री आदिवासी न्याय अभियान महाअभियान ही मोहिम देशभरात राबविणेत येत आहे. या योजनेच्या अंमलबजावणीकरिता केंद्र शासनाने ११ प्राथम्य क्षेत्र निश्चित केले असून, त्यामध्ये ९ मंत्रालयाचा समावेश केलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत आदिम जमातीच्या लोकांना जातीचे दाखले, आयुष्यमान भारत कार्ड, रेशनकार्ड, आधारकार्ड, जनधन खाते, इतर प्रमाणपत्रे व पीएम किसानचा लाभ देण्याचे निर्देश सचिव, जनजाती कार्यालय मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दिलेले आहेत. त्या अनुषंगाने खालापूर तालुक्यातील आदिवासी जमातीच्या व्यक्तींसाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी आदिवासी जमातीच्या व्यक्तींना जातीचे दाखले, आयुष्यमान भारत कार्ड, रेशनकार्ड, आधारकार्ड, जनधन खाते आदी मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर, वासांबे प्रभारी तळाटी पापटवार, ग्रामपंचायत सदस्या रसिका राकेश खराडे, सदस्या प्रतिक्षा रोशन राऊत, सदस्या ताई पवार, कोतवाल रवींद्र गायकवाड, योगेश नखाते, आशा सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी आदींच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले.

## वाहतूक कोंडीबाबतचे आंदोलन स्थगित

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर**

उरण शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी उरण तालुका दैनिक पत्रकार संघाने २९ ऑगस्टपासून उरण तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा उरण नगर परिषद व वाहतूक शाखेला निवेदनातून दिला होता, मात्र उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव आणि उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी त्यांच्या संबंधित प्रशासनाची बैठक बोलावून, उरण तालुका दैनिक पत्रकार संघाने, निवेदनातून मांडलेल्या, उरण शहराच्या वाहतूक कोंडीच्या व इतर समस्या जाणून घेतल्या.

पत्रकारांच्या मागणीनुसार या समस्यांवर ठोस उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे हे नियोजित धरणे आंदोलन संबंधित पत्रकारांनी स्थगित करावे, असे उरण नगरपरिषदेने उरण तालुका दैनिक पत्रकार संघाला २८ ऑगस्ट रोजी दिलेल्या पत्राद्वारे कळविले आहे. दरम्यान, उरणकरांच्या वाहतूक कोंडीच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाविषयी संबंधित प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जातील. त्यासाठी नगर परिषदेकडून अतिक्रमण नियंत्रण पथक गठीत करण्यात आले असून, त्यांच्याकडून वेळोवेळी आवश्यक कारवाई सुरू आहे.

वाहतूक कोंडीची समस्या व शहरातील नागरिकांच्या इतर समस्या लवकरच मागणी मार्गी लागतील, असे संघाला दिलेल्या लेखी पत्रातून कळविण्यात आले आहे.

## वॉरियर्स क्लबच्या प्रशिक्षणार्थी बालगोपाळांची दहीहंडी जल्लोषात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथील वॉरियर्स क्लबच्या प्रशिक्षणार्थी बालगोपाळांनी जल्लोषात दहीहंडी साजरी केली. वॉरियर्स क्लब या शिवकालीन मर्दानी खेळ लाठीकाठी, दांडपट्टा, तलवार बाजी व



कराटे आदींचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेचे प्रशिक्षक ओमकार सागर रंधवे यांच्या संकल्पनेतून श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून प्रशिक्षणार्थी बालगोविंदांची दहीहंडी आयोजित करण्यात आली.

बालगोपाळांनी अतिशय उत्साहात सहभागी होत जल्लोषात दहीहंडी साजरी केली. या वेळी बाल गोविंदांनी लाठी काठी खेळांचे रोमहर्षक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. त्याआधी सर्व बाल गोविंदा नृत्याविष्कार करीत थिरकले. पालकांनीही उत्साहाने सहभाग घेतला.

या वेळी वॉरियर्स क्लबचे संचालक ओमकार सागर रंधवे, सह संचालिका ऋतुजा सागर रंधवे तसेच ज्येष्ठ शिक्षक सागरकुमार रंधवे व अविनाश कजबजे, सर्व चिमुकले प्रशिक्षणार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खंडित वीजपुरवठ्याने नागरिक त्रस्त

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

सध्या सानपाडा, वाशी व जुईनगर येथे सातत्याने विज पुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे नागरीक त्रस्त झाले असून संताप व्यक्त करत आहेत. याबाबत २६ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनीच्या वाशी सेक्टर १७ येथील विभागीय कार्यालयात महावितरणचे अधीक्षक अभियंता संजय पाटील यांची सानपाडा पामबीच, वाशी सेक्टर ३० व जुईनगरमधील नागरिकांच्या शिष्टमंडळा सह माजी विरोधी पक्षनेते व भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दशरथ भगत यांनी भेट घेतली.



प्रभाग क्र. ६५, ७७ व ७८ मधील वारंवार खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठ्याबद्दल निवेदन दिले. या वेळी दशरथ भगत यांनी अधीक्षक अभियंता पाटील यांच्याशी चर्चा करताना इशारा दिला की, वारंवार खंडित होणारा विद्युत पुरवठा व त्यामुळे होणारे नागरिकांचे व व्यवसायिकांच्या नुकसानीची भरपाई करून द्यावी, यासाठी जिल्हाधिकारी व तहसीलदार स्तरावर पंचनामे करून घ्यावेत. तसेच विद्युत बिले आकारून ग्राहकांकडून करोडो रुपये जमा करणाऱ्या महावितरणने तात्पुरत्या स्वरूपातील थुकपट्टी स्वरूपाने दुरुस्त्या न करता, तिन्ही प्रभागातील केबल्स, डीपी, व जोडण्या या नव्याने कराव्यात. आगामी काही दिवसांत विद्युत कंपनी विरोधात तीव्र जनआंदोलन करण्यात येईल, आंदोलनामुळे होणाऱ्या शासकीय, यातयात, औद्योगिक व रहिवास परिणामांस महावितरण सर्वस्वी जबाबदार असेल, असा इशारादेखील भगत यांनी दिला. या वेळी ज्येष्ठ नागरिक, व्यापारी बांधव तसेच सानपाडा पामबीच विभागातील नागरिक यांची उपस्थिती होती.

**महावितरणचा तकलादू कारभार सुधारा, अधिक काळ वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाईबाधितांना द्या, विद्युत पुरवठा ही सेवा आहे की व्यवसाय, कंपनीच्या नावाखाली शासनाचे अपत्य आहे. यापुढे जार विद्युत पुरवठा खंडित झाल्यास जनआंदोलन पुकारणार आहोत.**
**–दशरथ भगत, माजी विरोधी पक्षनेते, नवी मुंबई मनपा**




### श्रावणसरी

आल्या धावत धावत श्रावणसरी
झिम्मा, फुगडीचा खेळ दारोदारी
शिरल्या धरणी मातेच्या पोटात
एकेक थेंब पडे तान्हेल्या ओठात

ओला चिंब झाला सारा शिवार
डोंगरमाथी लागे पाण्याची धार
चोहीकडे मातीच मधाळ लोणी
हिरवी सृष्टी नाचत गाते गाणी

आभाळात विजेने लपंडाव मांडला
काळ्या ढगातुनी वनी थेंब सांडला
फांदीवरी पाखरांचे खेळ रंगले
सुक्या दुष्काळाचे स्वप्न भंगले

नदी नाल्यास त्या सागराची ओढ
काळ्या मातीतुनी अंकुरले मोड
निसर्गाचा बहरूनी गेला संसार
त्याने आजवर ना मानली हार



–सुभाष कुडके,
नवीन पनवेल

## सिडकोचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे गुरुवारी (दि. २९) आयोजित करण्यात आलेले वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले.

या स्नेहसंमेलनास सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, गणेश देशमुख, दिलीप ढोले, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, महाव्यवस्थापक (कार्मिक) विशाल ढगे, सिडको एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस नितीन कांबळे आदी सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी विजय सिंघल यांनी कर्मचाऱ्यांना स्नेहसंमेलनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच सिडकोच्या आजवरच्या यशामध्ये कर्मचाऱ्यांना मोलाचा वाटा असल्याचे सांगून सिडकोचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह अन्य महत्त्वाकांक्षी प्रकल्प कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने लवकरच पूर्ण होणार असल्याचे प्रतिपादन केले.

सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाली. त्यानंतर स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वैयक्तिक व सामूहिक क्रीडा स्पर्धांमधील तसेच सांस्कृतिक स्पर्धांमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकही प्रदान करण्यात आले. प्रमुख कार्यक्रम झाल्यानंतर सिडको आर्टिस्ट कम्बाइन ग्रुपतर्फे सादर करण्यात आलेल्या गाण्यांनी उपस्थितांची दाद मिळवली.



## महाराष्ट्रीयन बिल्डर्स असोसिएशन नवी मुंबईची वार्षिक सर्वसाधारण सभा

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्रीयन बिल्डर्स असोसिएशन नवी मुंबई यांची वार्षिक सभा द पार्क हॉटेलमध्ये झाली. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज व गणेश पूजन, दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली तसेच दिवंगत बिल्डर कै.संग्राम पाटील व कै.दिलीप वढावकर यांना श्रद्धांजली देण्यात आली.

प्रस्तावना बाळासाहेब देशमुख व तुकाराम दुधे यांनी केली यात त्यांनी महाराष्ट्रीयन बिल्डर्स असोसिएशन स्थापन महाराष्ट्रीयन बिल्डरांना बिल्डर व्यवसायात येणाऱ्या सिडको प्रशासनाकडून येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगत पुढील ध्येय-धोरणे सांगितली.




या वेळी महाराष्ट्र बिल्डर्स असोसिएशन नवी मुंबई कमिटी अध्यक्ष सुरेश हावरे याचे आभार मानत नवनिर्वाचित कमिटीचे उपाध्यक्ष के के म्हात्रे, विकास भामरे, लक्ष्मण साळुंखे, महेश माटे, कार्याध्यक्ष हितेश सावंत, सहसचिव रवींद्र जोशी आणि अजित यालमार, सहखजिनदार उत्तम यलमार आणि संजय इंगळे, कमिटी सदस्य किरण बागड, बाबासाहेब भोसले, अजय पाटील, रामचंद्र मोरजकर, सुनील ठोंबरे, संतोष आंबवणे, आशिष काकडे, मीडिया प्रमुख राजेंद्र कोलकर, निमंत्रक संदीप सावंत, अध्यक्ष प्रकाश बाविसकर तसेच नवीन सदस्य पत्रकार यांचे स्वागत करण्यात आले.

या वेळी अध्यक्ष शंकर म्हात्रे, महासचिव तुकाराम दुधे, खजिनदार बाळासाहेब देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रायोजक आयडीबीआय बँक आणि रेरा व्हीजन हे होते. सुत्रसंचालन प्रवीण मोहोकर यांनी केले.

## निवडक

### खोपोलीत दहीहंडी उत्सव साजरा



**खोपोली :** गोकुळाष्टमीनिमित्त खोपोली शहर व परिसरात पारंपरिक पद्धतीने दहीहंडी उत्सव झाला. शहरातील जनता विद्यालय पटांगणात सुधाकर घारे फाउंडेशन आयोजित राष्ट्रवादी काँग्रेसची दहीहंडी फोडण्याचा मान स्वराज्य गोविंदा पथक खोपोली यांना मिळाला. या वेळी त्यांनी सहा थर लावून मानाची हंडी फोडून जल्लोष साजरा केला. या उत्सवाला प्रमुख आयोजक सुधाकर घारे, माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, राष्ट्रवादी शहराध्यक्ष मनीष यादव, माजी नगरसेवक मंगेश दळवी, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

### पुरस्कारासाठी अर्जाचे आवाहन

**रायगड** : ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय आणि डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कारासाठी आपले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह २५ सप्टेंबरपर्यंत तीन प्रतीत आपल्या जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १,००,००० रू., ७५,००० रू., ५०,००० रू. व २५,००० रू. आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. एक राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवकांना प्रत्येकी ५०,००० रू. आणि प्रमाणपत्र तसेच राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट कार्यकर्ता व एक उत्कृष्ट सेवक यांना प्रत्येकी २५,००० रू. आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.

### आकार प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांना मदत

**पोलादपूर** : तालुक्यातील हुशार, गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत करण्याचा निर्णय प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय सलागरे यांच्या अध्यक्षतेखालील कापडे बुद्रुक येथे झालेल्या आकार प्रतिष्ठान पोलादपूर या सामाजिक संस्थेच्या त्रैमासिक सभेत घेण्यात आला. प्रतिष्ठानमार्फत पुढील काही महिन्यांत विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. ऑक्टोबर २०२४मध्ये तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय करियर मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले जाणार असून डिसेंबर २०२४मध्ये तालुक्यातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या ११ मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे तसेच प्रतिष्ठानमार्फत तालुक्यातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्यात येणार असून त्याकरिता काही विद्यार्थ्यांची निवड संस्थेमार्फत करण्यात आली असून आर्थिक मदत करण्यात आली आहे. या सभेस उपाध्यक्ष रामदास सकपाळ, सचिव राजाराम शेलार, खजिनदार रविकांत सकपाळ, ज्येष्ठ विश्वस्त अजित जंगम, ज्ञानेश्वर सकपाळ व अमर सलागरे हे उपस्थित होते.


# खरबाचीवाडीत लवकरच मिळणार घरपोच पाणी

## रोहा उपअभियंता गांगुर्डे यांचे महिलांना आश्वासन; योजनेचे काम अंतिम टप्प्यात

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील खरबाची आदिवासीवाडी येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाणी योजनेचे काम चालू आहे. हे काम गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ सुरू आहे. त्यामुळे येथील आदिवासी महिलांना जीव धोक्यात टाकून दीड ते दोन किमी खोल दरीतून पाणी भरण्याची वेळ आली आहे. त्यामुळे अखेर येथील आदिवासी महिलांनी आवाज उठवताच तत्काळ रोहा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता विनायक गांगुर्डे यांनी दखल घेऊन येथील आदिवासी महिलांना येत्या एक ते दीड महिन्यांत घरपोच पाणी मिळणार आहे, असे आश्वासन दिले आहे.





दरम्यान गांगुर्डे यांनी सांगितले की, या योजनेचे योजनेचे काम ७० ते ८० टक्के पूर्ण झाले असून काही किरकोळ कामे बाकी आहेत. त्यात मुख्यतः एमएसईबीचे मीटर बसवणे, एनओसी देणे, पंप सोडणे, पाण्याच्या टाकीचा प्लास्टर करणे आदी कामे तत्काळ पूर्ण करून पाणीपुरवठा चालू करण्याच्या सूचना ठेकेदारास लेखी व तोंडी पत्रव्यवहार वेळोवेळी करण्यात आहेत.

खरबाची वाडी व इतर चार वाड्या मिळून येथील लोकसंख्या १००० ते ११०० इतकी आहे, परंतु पाण्याचा प्रश्न येथे गंभीर आहे. रोहा ग्रामीण पाणीपुरवठा हा ठेकेदारावर अंकुश ठेवण्यात अपयशी झाला असून, याचा परिणाम येथील आदिवासी यांना भोगावा लागत आहे. महिलांना जीव धोक्यात टाकून खोल दरीतून पाणी आणण्याची वेळ आली आहे. त्यामुळे अशा ठेकेदाराला वेळेत काम न केल्यामुळे ब्लॅक लिस्टमध्ये टाकावे अन्यथा पाणीपुरवठा विभागाने काम त्वरीत पूर्ण करून द्यावे, अशी मागणी खरबाचीवाडी येथील ग्रामस्थ सुषमा विनय पवार यांनी केली आहे.

**खरबाचीवाडी येथील जलजीवन मिशन योजनेचे काम ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने लवकरात लवकर पूर्ण करावे. त्याप्रमाणे ग्रामस्थांना पाणीदेखील सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.**

**–शुभदा पाटील–कुलकर्णी, गटविकास अधिकारी, रोहा**

# शिहू–नागोठणे मार्गावर मोकाट गुरांचा ठिय्या

## वाहतुकीला अडथळा; अपघातांना निमंत्रण

**पाली : प्रतिनिधी**

शिहू–नागोठणे–पोयनाड महामार्गाचे डांबरीकरण झाले आहे. त्यामुळे प्रवासी व वाहनचालक सुखावले आहेत, मात्र या मार्गावर मोकाट गुरांचा सातत्याने उपद्रव वाढला आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा येत आहे, तसेच अपघातांना निमंत्रण मिळत आहे.



हा मार्ग प्रवासी व माल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या मार्गावर वाहनांची वर्दळ सतत सुरू असते, मात्र मोकाट गुरांचा सातत्याचा होणारा रास्ता रोको वाहनचालक व प्रवाशांना त्रासदायक ठरत आहे. रस्त्यात ही गुरे ठाण मांडून बसत असल्याने वाहतूक कोंडीची समस्यादेखील निर्माण होताना दिसत आहे. रात्रीच्या वेळी दुचाकीस्वारांना रस्त्यात बसलेली गुरे दिसत नसल्याने गुरांना धडकून अनेकदा अपघात झाल्याच्याही घटना घडल्या आहेत. चालकांनी कितीही हॉर्न वाजविला तरी मोकाट गुरे जागची हालत नसल्याने यातून वाट कशी काढायची? असा प्रश्न चालकांसमोर उभा राहत आहे.

मालक, शेतकऱ्यांबरोबरच प्रशासनानेदेखील रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेत आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी बेणसे झोतिरपाडा येथील बबन अडसुळे यांनी केली आहे.

# माथेरानला नवीन मिनीबस द्या; स्थानिकांची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

कर्जत ते माथेरान दरम्यान धावणाऱ्या मिनीबसची सेवा अत्यंत डबघाईला आलेली असून जुन्या मिनीबस बंद करून या मार्गावर नवीन मिनीबस सुरू करावी, अशी मागणी सध्या जोर धरू लागली आहे.



स्थानिकांच्या मागणीनुसार कर्जत ते माथेरान ही बस सेवा उपलब्ध व्हावी यासाठी स्थानिकांना चार दशकांपासून संघर्ष करावा लागला होता. त्यानंतर ही बससेवा २००८मध्ये सुरू करण्यात आली आहे, परंतु या जुन्या मिनीबस अत्यंत डबघाईला आलेल्या असून या मार्गावर दोन मिनीबस उपलब्ध असतानादेखील एकच मिनीबस सातत्याने फेऱ्या मारत आहे, तर दुसरी मिनीबस कर्जत–पनवेल अशी धावत आहे. त्यामुळे ही नेहमीचीच धावणारी मिनीबस घाटरस्त्यात कुठेही बंद पडत असून प्रवाशांना लहान लहान मुलांना तसेच आबालवृद्ध नागरिकांना आपले सामान घेऊन नाहक पायपीट करावी लागत आहे, तर वेळप्रसंगी खासगी वाहनांना जादा रक्कम मोजून प्रवास करावा लागत आहे.

कर्जत आगाराला सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणारी माथेरान मिनीबस असून याबाबत प्रशासन अद्यापही गांभीर्याने घेत नाही ही खेदाची बाब असल्याचे बोलले जात आहे. स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाची हमी मिळावी यासाठी स्थानिकांनी मागील चार दशकांपासून पाठपुरावा केल्यानंतर ही मिनीबस सेवा उपलब्ध झाली आहे, परंतु प्रशासनाच्या कामचुकार पणामुळे प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.



**अलिबाग : भाजप अलिबाग तालुका आयोजित कमळ दहीहंडी फोडण्याचा मान गावदेवी गोविंदा पथक गोंधळपाडाने पटकावला.**

# दहिवली येथील तरुण तीन महिन्यांपासून बेपत्ता

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील दहिवली गावातील शिवाजीमहाराज नगरमध्ये राहणारे ३५ वर्षीय दीपक अनिल शिंदे हे १५ मेपासून हरवले आहेत. ते हरवले असल्याची तक्रार कर्जत पोलीस ठाण्यात नोंद असून त्यांच्याबद्दल अद्याप कोणतीही माहिती मिळत नसल्याने अशा व्यक्तीची माहिती मिळाल्यास कर्जत पोलीस ठाणे येथे कळविण्याचे आवाहन कर्जत पोलीस ठाणे यांच्याकडून करण्यात आले आहे.

दिपक अनिल शिंदे हे १६ मे रोजी १२ वा.चे दरम्यान घरातून आपल्या पत्नीस आणण्यासाठी घरातून निघाले होते, मात्र ते परतले नाहीत. त्यांची शोधाशोध करण्यात आली. नंतर २७ मे रोजी कर्जत पोलीस ठाण्यात त्यांच्या आई संगीता शिंदे यांनी, मुलगा हरवला असल्याची तक्रार दिली आहे.

दीपक शिंदे यांची उंची पाच फूट चार इंच, केस काळे, पुढील बाजूस टक्कल पडलेले, अंगात राखाडी रंगाचा उभ्या लाईन असलेला फुल शर्ट व ब्लु कलरची जिन्स पॅन्ट, पायात प्लास्टिकची चप्पल, उजव्या हाताचे मनगटाचे हाड मोडलेले असून त्यावर टाके असलेल्या खुणा दिसत आहेत. त्यांच्याबद्दल कोणतीही माहिती मिळाल्यास कर्जत पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी केले आहे.

# कर्जतमध्ये मतदार याद्यांत घोळ झाल्याचा राष्ट्रवादीचा आरोप

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघातील मतदारयाद्यांमध्ये मोठा घोळ झाला आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसने केला असून तब्बल १० हजार मतदारांची नावे गहाळ झाली असल्याचा दावा करीत कर्जत प्रांत अधिकारी प्रकाश संकपाळ यांना निवेदन दिले आहे.



कर्जत विधानसभा मतदारसंघातील मतदार याद्यांची पुनर्रचना करण्याचे करण्याचे काम राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाने सुरू आहे. त्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आक्षेप नोंदवला असून कर्जत आणि खालापूर तालुक्यातील मतदार याद्यांचे पुनर्रचना करताना मतदारसंघातील बुथनिहाय मतदार यादीमध्ये एकाच व्यक्तीची दुबार मतदार नोंदणी, मतदारांच्या नावांमधील रहिवासी पुरावा यावर प्रशासकीय अधिकारी व खाजगी संस्था, सेतू केंद्र यांच्या संगनमताने फेरफार करून बुथमधील स्थानिक मतदारांना त्यांच्या मूळ बुधपासून इतरत्र बूथमध्ये स्थलांतरित करण्याचे काम सुरू असल्याचा दावा केला आहे. त्याचवेळी आठ ते दहा हजार मतदारांचे नाव आणि पत्ते यात बदल करण्याचे काम काही प्रशासकीय अधिकारी आणि खासगी संस्था, सेतू केंद्र यांना हाताशी धरून रहिवाशी पत्त्यामध्ये अफरातफर करून मतदारांचे आपल्या मूळ बुथपासून स्थलांतरण करण्यात आल्याचे दिसून येत आह, तसेच अनेक मतदार यादीतील मतदारांच्या नावासमोर चुकीचे फोटो लावणे, नावात बदल करणे असे फेरफार सुरू असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वतीने करण्यात आला आहे.

या वेळी तालुकाध्यक्ष अ‍ॅड. स्वप्नील पालकर, बीड जि.प.गटाचे बंडू तुरडे, कर्जत तालुका राष्ट्रवादीचे सोशल मीडिया अध्यक्ष सुजित भोईर, कर्जत शहर राष्ट्रवादीचे अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष अमीर मणियार तसेच केतन बेलोसे, महेंद्र घारे, समीर भोईर, भूषण बाफना आदी उपस्थित होते.

# श्रावणसरी नृत्य स्पर्धेत वाकडाई महिला ग्रुप उतेखोल प्रथम

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रावण महिन्यात खास महिलांकरिता त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या वतीने महिला आघाडीच्या रायगड जिल्हाध्यक्ष उमा मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य श्रावणसरी नृत्यस्पर्धा २०२४चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत वाकडाई महिला ग्रुप उतेखोल प्रथम तर स्वामींनी महिला ग्रुप निजामपूर द्वितीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या.



या श्रावणसरी नृत्य स्पर्धेत तालुक्यातील एकूण २० महिला ग्रुपनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे परीक्षण काजल पाखुर्डे व ज्योती खरंगटे यांनी केले. प्रथम क्रमांक वाकडाई महिला ग्रुप उतेखोल यांना१०,००० रु., सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक स्वामिनी ग्रुप निजामपूर यांना ७००० रु., सन्मानचिन्ह तसेच प्रमाणपत्र, तृतीय क्रमांक जय हनुमान महिला ग्रुप चिंचवली यांना ५००० रु., सन्मानचिन्ह तसेच प्रमाणपत्र तर राजकन्या महिला ग्रुप निजामपूर यांना प्रथम उतेजनार्थ व मैत्री महिला ग्रुप तिलोरे यांना प्रत्येकी ३००० रु., सन्मानचिन्ह तसेच प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच या स्पर्धेत सहभागी झालेल्या इतर सर्व महिला ग्रुपना प्रत्येकी १५०० रु. व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमासाठी महिला आघाडी अध्यक्षा संगीता बक्कम, शहराध्यक्ष योगिता चव्हाण, माजी सभापती अलका केकाणे, माजी उपनगराध्यक्षा शुभांगी जाधव, महिला व बालकल्याण समिती सभापती सुविधा खैरे, नगरसेविका रिया उभारे, नगरसेविका ममता थोरे, नगरसेविका हर्षदा काळे, नगरसेविका लक्ष्मी हिलम, माजी नगरसेविका भाग्यश्री यादव, माजी नगरसेविका माधुरी मोरे, जिल्हा सोशल मीडिया प्रमुख किशोरी हिरवे, दीक्षिता जाधव, संगीता चव्हाण, तुलसा पवार, विशाखा यादव, शितल बेंदूगडे, देविका पाबेकर, रुतीका गायकवाड, अपूर्वा बोडेरे, दीप्ती मोरे, प्राजक्ता जाधव यांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी उपनगराध्यक्ष शुभांगी जाधव यांनी केले.

# भजन स्पर्धेत राधा कृष्ण मंडळ प्रथम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

डोंबिवली येथील अभंग फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या पोलादपूर तालुकास्तरीय वारकरी भजन स्पर्धेत कोतवालचे राधा कृष्ण भजन मंडळ डोंबिवली प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. या स्पर्धेमध्ये पोलादपूर तालुक्यातील नामांकित १० भजनी मंडळांनी सहभाग घेतला.

बक्षीस वितरण श्रीसंत मोरे माऊली संप्रदायाचे अधिष्ठानपती सद्गुरु दादामहाराज मोरे माऊली यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम क्रमांक कोतवाल गावातील राधा कृष्ण भजन मंडळ डोंबिवली, द्वितीय क्रमांक बोरज येथील श्री संत ज्ञानेश्वर माऊली भजन मंडळ घाटकोपर, तृतीय क्रमांक खोपड गावातील श्रीजननी कुंबळजाय भजन मंडळ घाटकोपर, उत्तेजनार्थ क्रमांक काटेतळी येथील महाकाली भजन मंडळ अंबरनाथला देण्यात आला. ताल संचसाठी गोळेगणी ग्रामस्थ मंडळ, उत्कृष्ट गायक म्हणून श्रीराम भजन मंडळ काटेतळी आणि हभप किरण महाराज मोरे, उत्कृष्ट वादक सडे येथील कांगोरीगड भजन मंडळ आणि हभप धीरज शिंदे तर आयोजक सोपानदादा मोरे व अभंग फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.



# भारत दौऱ्यासाठी 'किवीं'ची तयारी

## जेकब ओरम न्यूझीलंडच्या गोलंदाजी प्रशिक्षकपदी

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

न्यूझीलंड क्रिकेट संघाचा भारत दौरा या वर्षी ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये होणार आहे. या दौऱ्यात तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. त्यासाठी किवी संघाने आतापासूनच जोरदार तयारी करण्यावर भर दिला आहे. याचाच एक भाग म्हणून न्यूझीलंडने एका खास माजी खेळाडूला संघाचा नवा गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले आहे.



न्यूझीलंडचा संघ कसोटी मालिका खेळण्यासाठी भारत दौऱ्यावर येणार आहे. याच दरम्यान शेन जर्गेनसेनच्या जागी न्यूझीलंडचा माजी स्टार खेळाडू जेकब ओरम (गरलेल जीरा) हा न्यूझीलंड नवा गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून काम पाहील. जेकब ओरम हा धोनी आणि रोहित शर्मासोबत आयपीएल खेळला आहे. अशा परिस्थितीत त्याला भारतीय खेळपट्ट्यांचा चांगला अनुभव असल्याने ही न्यूझीलंडसाठी जमेची बाब असेल असे मानले जात आहे.

जेकब ओरमने पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या आठवड्याभरात न्यूझीलंडचा भारत दौरा सुरू होणार आहे. दोन्ही संघांमधील पहिली कसोटी १६ ऑक्टोबरपासून बंगळुरू येथे खेळवली जाणार आहे. दुसरा कसोटी सामना २४ ऑक्टोबरपासून पुण्यात होणार आहे, तर भारत आणि न्यूझीलंड यांच्यात मालिकेतील तिसरी आणि शेवटची कसोटी १ नोव्हेंबरपासून मुंबईतील वानखेडे मैदानावर खेळवली जाणार आहे.

गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून जेकब ओरम गेल्या वर्षी बांगलादेश दौऱ्यावर न्यूझीलंड संघासोबत गेला होता. या वर्षी फेब्रुवारीमध्ये ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या घरच्या टी–२० मालिका आणि २०२४च्या टी–२० विश्वचषकातही त्याने संघाची मदत केली होती, पण आता त्याचा पूर्णवेळ कोच म्हणून समावेश करण्यात आला आहे. ७ ऑक्टोबरपासून तो पदभार स्वीकारणार आहे.

# पावसाळी क्रीडा स्पर्धेत उसर खुर्द विद्यालयाचा दबदबा



**माणगाव : प्रतिनिधी**

तळा तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धा नुकतीच ज्ञानदीप विद्यामंदिर बोरघर या ठिकाणी झाली. या स्पर्धेत तालुक्यातील शैक्षणिक प्रगतीबरोबरच क्रीडा क्षेत्रात अव्वल असणाऱ्या उसर खुर्द येथील अभिनव ज्ञानमंदिर विद्यालयाने सुयश संपादन करून नेत्रदीपक कामगिरी केली आहे.

स्पर्धेत १४ वर्षे गटात मुलांमध्ये हर्ष बाबुराव तांबे ४०० मीटर धावणे प्रथम व ६०० मीटर धावणे द्वितीय, वेदांत जगदीश घाटवळ उंच उडी प्रथम व १०० मीटर रिले प्रथम, मुलींमध्ये रोशनी हरेश जाधव १०० मीटर धावणे प्रथम, १७ वर्ष गटात मुलांमध्ये समर्थ येरूणकर ८०० मीटर धावणे प्रथम, १५०० मीटर धावणे द्वितीय व उंच उडी प्रथम, मुलींमध्ये विशाखा प्रकाश नटे २०० मीटर धावणे प्रथम, दीक्षित दीपक साळुंखे २०० मीटर धावणे द्वितीय, जागृती संदेश कदम ४०० मीटर धावणे द्वितीय, आदिती रेवनाथ पाटील ४०० मीटर धावणे तृतीय, स्नेहा सचिन आंबर्ले १५०० मीटर धावणे प्रथम, आदिती रेवनाथ पाटील ३००० मीटर चालणे प्रथम, विशाखा प्रकाश नटे ३००० मीटर चालणे द्वितीय, कल्याणी किरण पतारे भालाफेक प्रथम, सलोनी संतोष गोळे हातोडाफेक प्रथम, निधी सुभाष महाडिक हातोडाफेक द्वितीय, रिले १०० मीटर तृतीय, १४ वर्षे गटात मुलींच्या संघाने कबड्डीत द्वितीय व मुलांच्या संघाने खो–खोमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थी जिल्हा स्तरावर तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे क्रीडा प्रमुख विनोद लाड, ए.व्ही. गावित, दीपक गुजर यांनी मार्गदर्शन केले, तर यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे, संस्थेचे सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, शालेय समितीचे अध्यक्ष प्रल्हाद आल्हाट, पालक, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# कर्जतमध्ये राष्ट्रीय खेळ दिवस साजरा



**कर्जत : प्रतिनिधी**

हॉकीचा जादूगार समजले जाणारे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस गुरुवारी (दि. २९) देशात राष्ट्रीय खेळ दिवस म्हणून साजरा करण्यात आला. कर्जत तालुक्यातही बहुसंख्य शाळांमध्ये विविध क्रीडा प्रकार व्हावेत यासाठी पाऊस असूनदेखील सर्व विद्यार्थी मैदानावर दिसून आले.

राष्ट्रीय खेळ असलेल्या हॉकीमधील जादूगार समजले जाणारे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय खेळ दिवस म्हणून साजरा करताना शहरातील कर्जत एज्युकेशन सोसायटीच्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे खेळ खेळण्यासाठी मैदानावर उतरवण्यात आले. त्याआधी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे पदाधिकारी प्रवीण गांगल, मदन परमार, सतीश पिंपरे आणि मुख्याध्यापिका अनुपम चौधरी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून तसेच क्रीडा ध्वज फडकावून करण्यात आले. क्रीडा शिक्षक आणि सर्व शिक्षकवर्ग विद्यार्थ्यांच्या सोबत मैदानावर उतरला होता आणि त्यांनीदेखील विविध मैदानी खेळांचा आनंद घेतला.

# पाकसमोर मालिका बरोबरीचे आव्हान

## आजपासून बांगलादेशविरुद्ध दुसरी कसोटी

**रावळपिंडी : वृत्तसंस्था**

बांगलादेशविरुद्धचा दुसरा कसोटी सामना जिंकून मालिका बरोबरीत संपवण्याचे मोठे आव्हान पाकिस्तानसमोर आहे. पाकिस्तानला मायदेशात बांगलादेशविरुद्धचा पहिला कसोटी सामना गमवावा लागला होता. यासह बांगलादेशने दोन सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडी घेतली. त्यामुळे दुसरा सामना पाकिस्तानसाठी 'करो किंवा मरो' असा आहे.

मालिका बरोबरीत संपवण्याचे मोठे आव्हान शान मसूदच्या नेतृत्वातील संघासमोर आहे. या मालिकेतील दुसरा सामना ३० ऑगस्ट ते ३ सप्टेंबरदरम्यान रावळपिंडी येथे खेळवला जाणार आहे. सलामीच्या सामन्यात बांगलादेशच्या



फिरकीपटूंनी कमाल करत यजमानांची पळता भुई थोडी केली. दुसरा कसोटी सामना जिंकण्यासाठी पाकिस्तानने संघात काही बदल केले आहेत.

पाकिस्तानचा संघ : शान मसूद (कर्णधार), सौद शकील, अबरार अहमद, मोहम्मद अली, सलमान अली अघा, सैय अयुब, मीर हमझा, मोहम्मद रिझवान, अब्दुला शफीक, नसीम शाह, खुर्रम शहजाद.

# पनवेल मनपातर्फे जिल्हास्तरीय हॉकी, कुस्ती स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा परिषद आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने नावडे येथील प.जो. म्हात्रे विद्यालय या ठिकाणी जिल्हास्तरीय शालेय नेहरू हॉकी स्पर्धा व कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धांना खेळाडूंचा प्रतिसाद लाभला.

स्पर्धेस आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त संतोष वारुळे, राज्य शासनाचा शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त टेबल टेनिसपटू संजय कडू,



राष्ट्रीय कुस्ती पंच संदीप वांजळे, पनवेल तालुका क्रीडा जिम्नॅस्टिक मार्गदर्शक व रायगड जिल्हा क्रीडा मार्गदर्शक भक्ती तिवारी, महाराष्ट्र हॉकी असोसिएशनचे खजिनदार कैलास सोनार, क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख नामदेव पिचड, नवी मुंबई पोलीस मुख्यालय नवी मुंबई स्पोर्ट्स प्रमुख राष्ट्रीय कुस्ती पंच संपती येलकर, गजानन हातमोडे, कुस्ती स्पर्धा प्रमुख प्रवीण खुटारकर, महापालिका क्रीडा विभागाचे समीर रेवाळे, प्रतिक म्हात्रे यांच्यासह शाळांचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# मुंबई विद्यापीठ क्रॉस कंट्री स्पर्धेत उरणच्या वीर वाजेकर कॉलेजची 'सुवर्ण' कामगिरी

**उरण : वार्ताहर**

मुंबई विद्यापीठांतर्गत अण्णा लिला कॉलेज कॉमर्स, इकोनॉमिक अ‍ॅण्ड शोभा जयराम शेट्टी कॉलेज ऑफ बीएमएस कुर्ला येथे मुंबई झोन क्रॉस कंट्री स्पर्धा गुरुवारी (दि. २९) झाली. या स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बाजी मारली.



स्पर्धेत फुंडे कॉलेजच्या मृणाल मनोहर सरोदे (टीवायबीकॉम) याने वैयक्तिक प्रथम क्रमांक आणि तृतीय क्रमांक प्रेम संतोष ठाकूर (एमए) याने पटकावला, तर सांघिक प्रथम क्रमांक मिळवून ट्रॉफी मिळविली. स्पर्धेत बंजारे गुलशन भोळाराम (एफवायबीकॉम), मुन्नाकुमार सोनालाल राय (एफवायबीकॉम), विवेक रविप्रताप यादव (एफवायबीएससी आयटी), प्रेमळ प्रमोद पाटील(एसवायबीए) या विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला होता.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष पी.जे.पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील, सुधीर घरत, भावना घाणेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.जी. पवार, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांना जिमखाना प्रमुख डॉ. विलास महाले, देवेंद्र कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'त्या' रिल्समुळे नवीन वैतागला

**नवी दिल्ली** : आयपीएल २०२३मध्ये विराट कोहली आणि नवीन उल हक यांच्यात मोठा वाद पहायला मिळाला होता. त्या वेळी विराटच्या चाहत्यांनी नवीन आणि कोलकाता नाईट रायडर्सचे प्रशिक्षक गौतम गंभीर यांना ट्रोल केले. अखेर विराट–गंभीर आणि नवीन उल हकने वाद मिटवून घेतल्याने चर्चा थांबली आहे, मात्र नवीनचा आता विराटबाबतचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे.

नवीनचा एक मजेदार व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो इन्स्टाग्रामवर विराटचे रिल्स पाहत होता, पण विराटव्यतिरिक्त त्यात काही वेगळा कंटेंट दिसला नाही. यानंतर तो वैतागला आणि त्याने फोन बंद केला. मग टीव्ही ऑन करण्याचा प्रयत्न केला.

# मुंबईतील शिवाजी पार्कमध्ये साकारणार आचरेकर सरांचे स्मारक

### शिष्य सचिन तेंडुलकरने शेअर केली भावूक पोस्ट



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताला मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर हा महान क्रिकेटपटू देणारे गुरू म्हणजे स्व. रमाकांत आचरेकर. आचरेकर सरांनी नवोदित क्रिकेटपटूंना प्रशिक्षण देण्यासाठी आपले आयुष्य व्यतीत केलेल्या मुंबईच्या शिवाजी पार्कमध्ये त्यांचे स्मारक बांधले जाणार आहे. सचिनने याबाबत सोशल मीडियावर पोस्ट करत आनंद व्यक्त केला आहे.

दादर येथील शिवाजी पार्क येथे आचरेकर सरांनी केवळ सचिन तेंडुलकरालाच नव्हे; तर प्रवीण अमरे, विनोद कांबळी, चंद्रकांत पंडित यांसारख्या इतर अनेक खेळाडूंना क्रिकेट प्रशिक्षण दिले, जे नंतर भारतीय संघातून खेळले. महाराष्ट्र सरकारने द्रोणाचार्य पुरस्कार विजेत्या प्रशिक्षकाच्या स्मरणार्थ स्मारक बांधण्यास मान्यता दिली आहे.

नगरविकास विभागाने जारी केलेल्या शासकीय प्रस्तावानुसार शिवाजी पार्कच्या गेट क्रमांक ५ येथे रमाकांत आचरेकर यांचे ६X६X६ आकाराचे स्मारक बांधण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. मुंबईच्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने स्मारकाच्या बांधकामाची शिफारस केली होती. याबाबत सचिनने आचरेकर सरांचा फोटो शेअर करत या निर्णयामुळे खूप आनंद झाल्याचे म्हटले आहे.

# कसोटी क्रमवारीत बाबरला फटका, ब्रूकला फायदा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यात खेळल्या जाणाऱ्या कसोटीदरम्यान आयसीसीने ताजी कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. या वेळी क्रमवारीत मोठा बदल झाला आहे. पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमला क्रमवारीत मोठा फटका बसला आहे, तर इंग्लंडचा युवा खेळाडू हॅरी ब्रूकला याचा सर्वाधिक फायदा झाला आहे. त्याचबरोबर भारताच्या विराट कोहली आणि यशस्वी जैस्वाल यांनाही फायदा झाला आहे.



आयसीसीच्या नव्या कसोटी क्रमवारीत पाकिस्तानचा फलंदाज बाबर आझमला सर्वाधिक फटका बसला आहे. फलंदाजांच्या क्रमवारीत तो तिसऱ्या स्थानावरून नवव्या स्थानावर घसरला आहे. गेल्या आठवड्यात तो तिसऱ्या क्रमांकावर होता. सध्या तो टॉप १०मधून बाहेर पडण्याच्या मार्गावर आहे. याशिवाय भारतीय संघाच्या तीन फलंदाजांना खूप फायदा झाला आहे. रोहित शर्मा सहाव्या स्थानावर आला आहे. यशस्वी जैस्वालला एका स्थानाचा फायदा झाला आहे. तो आता सातव्या स्थानावर पोहचला आहे. भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली आता दोन स्थानांच्या प्रगतीसह आठव्या स्थानावर पोहचला आहे.

मँचेस्टरमध्ये श्रीलंकेविरुद्धच्या चांगल्या कामगिरीनंतर इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूट कसोटी फलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थानावर कायम आहे. बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात शानदार शतक झळकावणारा पाकिस्तानचा यष्टीरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवानलाही फायदा झाला आहे. तो सात स्थानांच्या प्रगतीसह संयुक्त १०व्या स्थानावर पोहचला आहे. इंग्लंडच्या हॅरी ब्रूकला तीन स्थानांचा फायदा झाला असून तो चौथ्या स्थानावर पोहचला आहे.

### गोलंदाजी, अष्टपैलूंमध्ये भारतीय खेळाडू वरचढ

भारताचा अनुभवी ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विन गोलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानी आहे. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि डावखुरा फिरकी गोलंदाज रवींद्र जडेजा अनुक्रमे तिसऱ्या आणि सातव्या स्थानावर आहेत. अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत जडेजा आणि अश्विन पहिल्या दोन स्थानांवर आहेत, तर अक्षर पटेल सहाव्या स्थानावर आहे.

# रायगड जिल्हास्तरीय बेंचप्रेस क्लासिक आणि इक्विप स्पर्धा कर्जत येथे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने रायगड जिल्हास्तरीय बेंचप्रेस क्लासिक आणि इक्विप स्पर्धा (पुरुष आणि महिला) या सब ज्युनिअर, ज्युनिअर, सीनियर, मास्टर अशी सर्व गटांची स्पर्धा रविवारी (दि. १ सप्टेंबर) रोजी कर्जत मुद्रे येथील रॉयल गार्डन या ठिकाणी होणार आहे.

स्पर्धा रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या सौजन्याने होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटक म्हणून घारे यांच्यासह विशेष अतिथी म्हणून शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त, महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय सरदेसाई उपस्थित राहणार आहेत.

या स्पर्धेचे व्यवस्थापन राष्ट्रीय वेटलिफ्टिंग खेळाडू हनुमंत खरात (जेव्हीआर हार्डकोअर फिटनेस सेंटर, कर्जत), तर कर्जत शहर राष्ट्रवादी काँग्रेस हे सहाय्यक काम पाहत आहेत.

या जिल्हास्तरीय स्पर्धेतून राज्य स्पर्धेसाठी रायगडचा बेंचप्रेस संघ निवडला जाणार आहे, अशी माहिती पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे कार्यवाह अरुण पाटकर व सहकार्यवाह सचिन भालेराव यांनी कळविले आहे.

जीवेत् शरदः शतम्!
गजानन भगत
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
राजेश सकते

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com